म. ग्रं. सं. ठाणें

विषय
चरित्र

संग्रहालय क्रमांक
~~३२५~~
३८४

लेखक भास्कर हरि
भागवत

पुस्तकाचें नांव राजा राम

राय ३८४

सन

२५

(चरित्र)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे नं. १२०
सं. ग्र. १२०

LIFE

OF

# RAJAH RAMMOHUN ROY

# राजा राममोहन राय

यांचें

चरित्र

भास्कर हरि भागवत

यांणीं

इंग्रेजी ग्रंथांवरून

केलें.

मुक्काम मुंबई.

गणपत कृष्णाजी यांच्या छापखान्यांत छापिलें.

सन १८५८.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# प्रस्तावना.

या पुस्तकाविषयीं प्रस्तावनारूप चार ओळी लिहिणें आवश्यक आहे असें वाटतें.

इतिहास आणि मोठ्या मनुष्यांचीं चरित्रें वाचणें उपयोगाचें आहे हें सर्वांस मान्यच आहे. परंतु राममोहन रायाचें चरित्र वाचणें ह्मणजे सध्या विशेषेंकरून उपयोगी आहे. कारण इंग्रेजी विद्येच्या योगानें उत्पन्न झालेल्या ज्या नव्या विचारांचा प्रसार या देशांत दिवसानुदिवस अधिक होत आहे तें आपण ग्रहण करून, इतरांच्या ठायीं त्यांची प्रवृत्ति करण्याविषयीं यत्न करणारा राममोहन राय हाच पहिला° होय. आणि दुसरें असें, कीं राममोहन रायास इंग्रेजी अवगत असून संस्कृत भाषेचें आणि ग्रंथांचें उत्कृष्ट ज्ञान होतें; आणि त्याणें धर्माविषयीं जेवढा विचार आणि शोध केला होता तेवढा आजपर्यंत इंग्रेजी शिकलेल्यांपैकीं कोणींच केला नाहीं, व पुढें करणारे तरी थोडेच निघतील असें वाटतें. या कारणास्तव सर्व युरोपिअन विद्वज्जनांमध्यें राममोहन रायाच्या मतांचें वजन बहुत पडतें, आणि तसेंच आमच्या मराठी लोकांमध्येंहि पडेल अशी आशा आहे. सांप्रतकाळीं, नव्या मंडळीस संस्कृताचें परिज्ञान नाहीं हा दोष त्यांवर आणून, त्यांस वादविवादामध्यें कुंठित

करण्याची एक युक्ति विरुद्धपक्षी लोकांस सांपडली आहे, आणि ते तिचा फारच उपयोग करीत असतात. परंतु राममोहन रायावर त्यांच्यानें हा दोष लागू करवणार नाहीं. आतां, राममोहन रायाचा वृत्तांत वाचणें इतकें विशेष उपयोगाचें तें याच कारणास्तव; आणि स्वदेशीय लोकांनीं हें पुस्तक वाचून यांत राममोहन रायाविषयीं जें कांहीं लिहिलें आहे त्यावर विचार करावा, आणि त्यापासून आपलें कांहीं तरी वास्तविक हित करून घ्यावें, हाच तें छापण्याचा माझा सगळा हेतु आहे.

या पुस्तकांतील बहुतेक मजकूर "कलकत्ता रिव्यू". नामक एका इंग्रेजी त्रैमासिक पुस्तकांतून घेतला आहे त्या पुस्तकांतील मूळवृत्तांत एका हिंदूनेंच लिहिलेला आहे. त्या लिहिणाराचे बहुतेक विचार योग्य वाटल्यामुळें जरी यांत घेतले आहेत तरी त्यांतील कित्येक गाळलेहि आहेत, व कोठकोठें मजकूर फार लांबट वाटल्यावरून तो संक्षिप्त करून लिहिला आहे. यास्तव हें त्याचें शब्दशः भाषांतर आहे किंवा यांतील आणि त्यांतील अगदीं वाक्यास वाक्य सर्वत्र मिळेल असें नाहीं. तसेंच, अन्यत्र कोठें राममोहन रायाचे वृत्तांत लिहिलेले सांपडले ते वाचून, त्यांत त्याविषयीं जें कांहीं नवें आढळलें तेंहि कोठकोठें घातलें आहे.

# राजा राममोहन राय याचें चरित्र.

लोकांच्या सुधारणुकीवरून पहातां, सध्याचा काळ हा अति आनंदकारक आहे. यास शोधाचें आणि विचाराचें युग ह्मटलें असतां साजेल. सर्व हिंदुस्थान देश, आणि, विशेषेंकरून, त्यांतील मुख्य शहरें, यांमध्यें एका फेरफाराचा क्रम सुरू झाला आहे, तो मोठा मनोरंजक आणि उपयुक्त आहे. या फेरफाराचें बीजारोपण प्रथमतः हिंदुस्थानाची मुख्य राजधानी कलकत्ता येथें झालें; व अद्यापि त्याणें (कलकत्त्यानें) राज्यप्रकरणीं आपला पुढारीपणा आहे तसाच या प्रकरणींहि राखिला आहे, आणि पुढेंहि राखील असा संभव दिसतो. परंतु हा जो फेरफार हिंदु लोकांच्या मनांवर सध्या होत आहे, आणि विद्येच्या प्रसारेंकरून ज्यास बहुत सहाय्य मिळालें आहे, त्याच्या इतिहासाविषयीं विचार करितांना, आपणास एका पुरु-

याचें स्मरण अवश्य होतें; तो कोण ह्मणाल तर राजा राममोहन राय. या अवघ्या फेरफाराचें उत्पत्तिकारण हा गृहस्थ होय; याजकरितां त्याचा वृत्तांत स्वतः अति मनोरंजक आहे इतकेंच नाहीं, तर त्या फेरफाराचें वास्तविक स्वरूप आणि इतिहास समजण्यासच तो आवश्यक आहे.

राममोहनराय याचा जन्म सन् १७७४ रांत बंगाल प्रांतीं बरद्वान परगण्यांत राधानगर येथें झाला. त्याचे वडील मोठे कुलीन ब्राह्मण असून बहुत काळापासून आपलें जातिकर्म करून उदरनिर्वाह करीत असत. याप्रमाणें राममोहन रायापासून मागल्या पांचव्या पुरुषापर्यंत त्यांणीं धर्मकर्म चालविलें, परंतु त्या पांचव्या पुरुषानें, सुमारें दीडशें वर्षांपूर्वीं, तो पारमार्थिक धंदा सोडून, इह लोकींचें सुख आणि वैभव यांचा स्वीकार केला. त्यांच्या घराण्यांत हें कर्मांतर, औरंगजेब बादशाहाच्या कारकिर्दींत झालें. हा बादशाह शाहाणा, हिंमतदार, असा होता खरा, परंतु महंमदी धर्माचा मोठा अभिमानी आणि पक्षपाती असल्यामुळें, तो हिंदु धर्मास आणि त्याच्या अधिकाऱ्यांस फार पीडा देत असे. यावरून, हें अंतर स्वेच्छेनें झालें किंवा त्या जुलमांमुळें झालें असावें, हें बराबर समजत नाहीं. असो, त्या दिवसापासून पुढें त्यांच्या घरांतील पुरुषांनीं मोठमोठीं कामें केलीं, पदव्या भोगिल्या, आणि राज्यसंबंधी पुरुषांस प्रायः जीं सुखदुःखें अनुभवावीं लागतात तीं सर्व अनुभविलीं.

बंगाल सुभ्याचें मुख्य शहर मुरशेदाबाद येथील दरबारीं राममोहन रायाच्या आजानें मोठीं प्रतिष्ठेचीं व जोखिमाचीं कामें केलीं. त्या वेळेस सुराजउद्दवला हा सुभेदार (नवाब) होता. तो इतका दुष्ट होता कीं आपल्या हिंदु रयतेचीं घरें जाळून टाकणें, मनुष्यांनीं भरून चाललेलीं तारवें बुडविणें, आणि कधींकधीं गरोदर स्त्रियांस (ज्यांचें वर्णन केलें असतां आंगावर रोमांच उभे रहातील अशा प्रकारचीं) वेदनाकारक दुःखें देणें, असल्या गोष्टींत त्यास आनंद वाटत असे. राममोहन रायाचे तीर्थरूप रामकंठ राय यांचा मुरशेदाबाद येथील दरबारीं कांहीं आपमान झाला तो त्यांस सहन न झाल्यामुळें, ते चाकरी सोडून बरद्वान परगण्यांत राधानगराजवळ त्यांचें वतन होतें तेथें जाऊन राहिले, आणि तेथें त्यांची पत्नी राममोहन हा पुत्र प्रसवली.

राममोहन रायाची मातोश्री ही समजदार बाई होती. आपल्या देशाच्या अज्ञान व वेड्या समजुतींमध्यें जरी ती लहानाची मोठी झाली होती, तरी त्या सर्व अज्ञान व वेड्या समजुती आहेत अशी तिच्या पुत्रानें कित्येक अंशीं तिची खात्री केली. ती त्यास ह्मणाली, "राममोहना, तुझें ह्मणणें आणि मत हीं वास्तविक आहेत, आणि हीं सोवळींओवळीं वगैरे कर्में सर्व मिथ्या आहेत, ही गोष्ट खरी, परंतु आमची अशक्त स्त्रियांची जाति, आणि तशांत मी तर आतां फार वृध्द झाल्यें, याजकरितां माझ्यानें तीं टाकवत नाहींत." मग कां-

हीं दिवसांनीं ती ओढ्या जगन्नाथास गेली, आणि तेथें देऊळ झाडणें वगैरे देवसेवेंत काळ घालवीत असे; नंतर सुमारें एका वर्षानें ती तेथेंच मरण पावली. तिणें जातेसमयीं चाकर वगैरे कांहीं एक आपणाबरोबर घेतलें नाहीं, अगदीं एकटीच गेली. ती मोठ्या संभावित कुळांतली होती, व तिचे वडील मोठे कर्मनिष्ट आणि कडक ब्राह्मण असत, आणि त्या घराण्यांतील पुरुष अद्यापिहि, आमच्या आजापणजांनीं केलें तेंच आह्मी करूं असें ह्मणून चालणारे आहेत.

बंगाल्यांत वरच्या प्रतीच्या लोकांत अशी चाल आहे, कीं ते प्रथमतःच आपल्या मुलांस शाळेंत पाठवीत नाहींत, परंतु गुरुमहेश या नावाचा एक शिक्षक आपल्या घरीं ठेवून त्याकरवीं त्यांचा मूळविद्याभ्यास करवितात. अशा रीतीनेंच राममोहन राय याच्या शिकण्यास आरंभ झाला. हा गुरुमहेश, मुलांचीं मनें प्रफुल्लित करण्याबद्दल, त्यांच्या बुद्धि आकुंचित करितो असें ह्मटल्यास चिंता नाहीं. ते कांहीं हिशोब करणें आणि अक्षर लिहिणें इतकेंच काय तें त्याजवळ शिकतात. पुढें ते आठ नउ वर्षांचे झाल्यावर त्यांस इंग्रेजी शाळेंत पाठवितात. यावरून हें उघडच आहे, कीं त्यांस स्वभाषेचें ज्ञान होण्याचा संभव थोडाच असतो. परंतु राममोहन रायाविषयीं अशी गोष्ट नव्हती. त्याणें परिश्रमेंकरून बंगाली भा-

षेचें सर्वोत्कृष्ट ज्ञान संपादिलें इतकेंच नाहीं, तर ती भाषाच स्वतः सुधारून पहिल्यापेक्षां चांगली केली. तथापि ती भाषा अजून तरी पूर्ण दशेस आली असें नाहीं. व्यास, वाल्मिक, मनु, इत्यादिकांनीं शृंगारलेली जी संस्कृत भाषा तिजपेक्षां ही बंगाली भाषा फारच कमी आहे, आणि ती पूर्ण दशेस येण्यास शेंकडो वर्षे पाहिजेत ही गोष्ट खरी; परंतु सांप्रतकाळीं ती देशभाषा असल्यामुळें फार अगत्याची आहे. संस्कृत जरी पूर्ण भाषा आहे तरी ती आतां सर्व साधारण हिंदु प्रजेस ज्ञान प्राप्त होण्याचें साधन होणें अशक्य आहे; कारण तिच्या व्याकरणादिकांचे नियम इतके पुष्कळ आणि कठीण आहेत, कीं आतां ती भाषा शिकणें ह्मणजे एक मोठें कठीण काम होतें. हें सर्व राममोहन रायाच्या ध्यानांत वागत होतें, ह्मणून त्याणें बंगाली भाषाच सुधारण्याचें मनावर धरिलें; आणि त्याचे श्रम बरेच सफळ झाले. ईश्वराचे गुण आणि दुसरे कित्येक उच्च विचार तींत प्रगट करण्याची जरी प्रथमतः त्यास अडचण पडली, तरी संस्कृतांतून तदर्थवाचक शब्द घेऊन त्याणें ती परिहार केली. त्याकाळीं बंगाली भाषेंत त्यासारिखा वाकब दुसरा कोणच नव्हता. त्याच्या लिहिण्याची शैली फार सुलभ असून, स्पष्ट करण्याची रीति जशी चांगली असे तशी दुसऱ्या कोणाचीच नसे. इतकें झालें तथापि, इतर

प्राकृत भाषांप्रमाणेंच, शास्त्रीय संज्ञांचा कोश करणें किंवा एकाद्या गहन शास्त्रीय विषयावर ग्रंथ लिहिणें झाल्यास, बंगाली भाषा अजूनहि कच्ची आहे. परंतु अलीकडेस सरकार हिंदु भाषांकडेस बरेंच लक्ष देऊं लागलें आहे, यावरून त्या लौकरच सुधारतील अशी आशा आहे.

बंगाली भाषेचें थोडेंसें ज्ञान झाल्यानंतर, राममोहन रायास पाटणा येथें आरबी आणि फारसी शिकायास पाठविलें. सांप्रतकाळीं इंग्लिश भाषा आहे याप्रमाणें, त्या वेळीं संपत्ति आणि मानमान्यता मिळविण्यास या भाषा आल्या पाहिजेत असें होतें. या भाषांचा अभ्यास केल्यावरून, मूर्तिपूजेविषयीं त्याच्या मनांत विकल्प येऊं लागले असतील असें वाटतें. "देव एकच" हें ज्या धर्माचें मुख्य मत, त्याचें ज्ञान त्यास होतांच, बहुदैविक अशी जी आपल्या देशची मूर्तिपूजा व तत्संबंधी कर्में, त्यांवरून त्याचें मन सहजच उडालें. पाटणा येथें असतां, मौलवी लोकांनीं अरिस्टॉटल् आणि यूक्लिड यांच्या ग्रंथांच्या आरबी भाषांतरांकडेस त्याचें लक्ष लाविलें, तेणेंकरून त्याच्या मनास सुशिक्षा प्राप्त होऊन, तें प्रफुल्लित झालें. पाटणा येथें शिकायाचें होतें तेवढें झाल्यावर, आपल्या देशांतील मुख्य आणि विद्वज्जनाची अशी जी संस्कृत भाषा ती शिकायास तो काशीस गेला. वास्तविक ह्मटलें असतां, या ठिकाणीं त्याणें आपल्या पुढील महत्वाचा

पाया घातला. संस्कृत भाषा, आणि तींत सांचवून आणि टाळून ठेविलेलें धन हीं संपादण्यास, त्याणें केवढ्या उत्कंठेनें श्रम केले असावे याविषयींची कल्पना, पुढें जे उत्तम परिणाम घडून आले त्यांवरून, सहज करितां येती.

या वेळीं राममोहन राय केवळ अल्पवयस्क असतांहि, एतद्देशीय लोकांस हजारो वर्षांपासून ज्या अज्ञानानें व वेड्या समजुतींनीं गर्क करून टाकिलें आहे तें अज्ञान व त्या वेड्या समजुती यांस त्याच्या तीव्र बुद्धीपुढें लपायास जागा सांपडली नाहीं. पाटणा येथें असतां, त्याणें अरिस्टॉटल् आणि यूक्लिड यांच्या ग्रंथांचें लक्षपूर्वक अवलोकन केल्यावरून, न्यायशास्त्राप्रमाणें सयुक्तिक रीतीनें विचार आणि भाषण करण्याचा अभ्यास त्यास पडून गेला होता, आणि कुराणोक्त मतांचीहि त्यास बरीच माहिती झाली होती; यावरून, पुराणोक्त मार्ग असत्य असून तीं पुराणें केवळ अलंकाररूप इतिहासानें व कांहीं अंशीं दंतकथांनींहि भरलेलीं आहेत अशी, लौकरच त्याची खात्री झाली; आणि त्याप्रमाणें, तो या वेळीं सोळावर्षांचा असतांच, त्याणें हिंदूंची मूर्तिपूजा हिजवर एक ग्रंथ लिहिला. हिंदुस्थानांत आणि तसेंच इतर देशांत तरी, एवढ्या अल्पवयी मुलाच्याठायीं इतकें सामर्थ्य व धैर्य आढळणें ह्मणजे कठीण, असें असतां राममोहन रायानें एवढ्या लहान वयांतच प्रसिद्धपणें मूर्तिपूजेचा त्यागकरून तन्निषेधक ग्रंथ लिहिला, यावरून

त्याच्या बुद्धीचें व धैर्याचें आश्चर्य केल्यावांचून आपल्या-च्यानें रहावत नाहीं. त्याणें असें केल्यामुळें त्यास बहुत तोटे सोसावे लागले; बापाच्या मालमत्तेवरचा त्याचा दावा नाहींसा झाला, आणि त्याचे अगदीं जवळचे आप्तहि त्या-वर अतिशय रुष्ट झाले. त्याचा बाप जो अगदीं जुन्या चालींप्रमाणें चालणारा होता, त्यास आपल्यापुत्राचीं हीं विप-रीत मतें सहन होईनात. अशा समयीं राममोहन राया-विषयीं विचार करणें यांत मोठी मौज आहे. तो वयानें केवळ मूल असून चरितार्थास्तव त्यास आपल्या पित्याचेंच अवलंबन करावें लागत असे, आणि आपलीं वास्तविक मतें लोकांस विदित झालीं असतां आपणावर मोठा कहर होईल अशी त्याची खात्रीहि होती, तरी त्याणें तीं प्रगट करण्यास मागें पुढें पाहिलें नाहीं. अशा या नीतिधै-र्याचें आणि मनाच्या स्वतंत्रतेचें आपणास आश्चर्य झाल्यावां-चून रहात नाहीं. नाहीं तर अमुक करावें आणि अमुक न करावें असें तोंडानें बोलणारे आपण पुष्कळ आहों, परंतु त्याचें फळ काय? या आपल्या महा तेजस्वी आणि पराक्रमी देशबंधूप्रमाणें खरें धैर्य धरून कोणी हातानें कृति करून दाखवितील तर कांहीं उपयोग.

राममोहन राय यावर त्याच्या पित्याची गैरमर्जी होऊन, कुटुंबांत रहाण्यांत सुख नाहीं असें त्यास वाटल्यावरून, त्या-णें देशाटन करण्याचा निश्चय केला. या पर्यटनामध्यें हिंदु-

स्थानाच्या निरनिराळ्या भागांत कोणतीं निरनिराळीं धर्ममतें आहेत, त्यांचें लोकांवर किती वजन पडतें, आणि त्यांपासून त्यांच्या मनांवर आणि वर्तणुकीवर कसकसे परिणाम घडून येतात, हें जाणून घेण्याकडेसच त्याणें विशेष लक्ष दिलें. या वेळेस त्याचें वय सोळा वर्षांचेंच होतें. हिंदु ह्मणजे शरिरानें अशक्त आणि त्यास धर्माच्या बहुत अडचणी, यामुळें पर्यटन करण्यास फारसा प्रवृत्त होत नाहीं; केलें तरी यात्रेच्या निमित्तें शेंदोनशें कोशांचें मात्र करितो; परंतु राममोहन रायाचा हेतु, लोकांच्या स्थितीचें ज्ञान व्हावें हा होता. हिंदुस्थानाच्या कित्येक प्रांतांत जाऊन आल्यावर, तो तिबेटांत गेला. तेथील लोकांची लामा नामक देवाची पूजा करण्याची रीति पाहून त्यास लौकरच कंटाळा आला; आणि त्या लोकांसमक्ष त्याणें त्या देवाची निंदा केल्यावरून त्यांस फार क्रोध आला. तो दुसऱ्याहि कित्येक देशांत गेला. नंतर त्याचें वय सुमारें वीस वर्षांचें झालें तेव्हां त्याच्या मातोश्रीच्या मध्यस्थीवरून, त्याच्या बापाच्या मनांत पूर्वीप्रमाणें त्यावर प्रीति करावी असें आलें, आणि त्याणें त्यास घरीं बोलाविलें.

राममोहन राय घरीं आला तेव्हां त्याच्या पित्यानें त्यास चांगला प्रेमा दाखविला. यानंतर वेद आणि पुराणें यांचा अभ्यास करायास तो लागला. तीं शिकणें, आणि

व्यास, मनु, आणि शंकराचार्य, यांणीं शास्त्रांवर लिहि-
लेल्या ग्रंथांत शोध करणें, यांविषयीं जी त्याची उत्कंठा
आणि परिश्रम त्यांवरून, पुढें ज्या फेरफाराशीं त्याचें नाव
जोडलें गेलें आहे तो त्याणें या वेळेसच मनांत योजून ठे-
विला होता, असें दिसतें.

वीस वर्षांच्या वयाच्या सुमारास त्याणें इंग्रेजी भा-
षा शिकायास आरंभ केला; परंतु ज्या दुसऱ्या भाषां-
चें ज्ञान त्यास चांगलें झालें होतें त्या शिकतांना त्यांक-
डेस लक्ष लावून त्याणें जसे परिश्रम केले होते, तसे या
भाषेविषयीं त्याजकडून घडून आले नाहींत, यामुळें साहा
वर्षांपर्यंत तींत सांगण्याजोगी त्याची गति झाली नाहीं.
मग नेहमीप्रमाणें जेव्हां त्याणें आपल्या मनाचा निग्रह करून
तिजकडे लक्ष दिलें, तेव्हां त्यास तिचें इतकें ज्ञान झालें, कीं
ती त्यास शुद्ध रीतीनें लिहितां बोलतां येऊं लागली. प-
रंतु कित्येक असें ह्मणतात कीं राममोहनराय याणें केलेल्या
इंग्लिश ग्रथांवरून त्याच्या इंग्लिश भाषेच्या ज्ञानाची परीक्षा
करूं नये; कांकीं त्या ग्रथांतील मजकूर आणि विचार खुद्द
त्याचे असून, भाषा बहुधा त्याच्या इंग्लिश मित्रांनीं शुद्ध के-
लेली असे. त्यास इंग्लिश भाषेचें चांगलें ज्ञान होतें, परंतु इं-
ग्लिश पंडितांप्रमाणें उत्कृष्ट किंवा पूर्ण होतें असें नाहीं. धर्म-
प्रकरणीं अथवा राज्यप्रकरणीं पुस्तकें छापतांना, भाषेविषयीं
त्यास विद्वान् आणि प्रतिष्ठित अशा एका युरोपियन गृह-

स्याचें सहाय्य असे; त्यास दाखविल्याविना बहुधा तो कांहीं छापायास पाठवीत नसे. असें करण्यांत त्याचा हेतु इतकाच कीं, युरोपियन लोकांत आपल्या विचारांचा प्रसार होऊन त्यांस ते विदित व्हावे; आणि याजकरितां ते विचार शुद्ध आणि रसभरित भाषेंत प्रगट करणें अवश्य पडे. असें न करितां, तो ते आपल्या साधारण भाषेंतच लिहिता, तर त्यांकडेस त्याच्या युरोपियन मित्रांचें लक्ष तितकें लागलें नसतें; आणि त्या मित्रांच्या सहाय्यावरून सिद्धीस जाणारीं जीं कित्येक त्याचीं कार्यें, तीं कदाचित् तडीस नजातां तशींच राहिलीं असतीं.

परंतु ही गोष्ट यद्यपि खरी असली तथापि राममोहन रायासारिख्या विद्वानास तिजपासून कांहीं अपमान पोंहचतो असें नाहीं. तो बंगाली लिहिणार सर्वोत्कृष्ट, संस्कृतांत उत्तम प्रतीचा विद्वान्, त्यास आरबी, फारसी, हिंदी आणि उर्दु भाषांचें चांगलें ज्ञान होतें, व ग्रीक, लाटिन, हिब्रु आणि फ्रेन्च ह्याहि भाषा बऱ्याच अवगत होत्या, आणि याखेरीज, इतिहास, पदार्थविज्ञान, गणित, मानःशास्त्र, नीतिशास्त्र, इत्यादि अनेक शास्त्रांचें ज्ञान होतें, तेव्हां त्यास एका इंग्लिश भाषेचें पूर्ण ज्ञान नसलें ह्मणून काय झालें ?

राममोहन रायाचे तीर्थरूप रामकंठ राय हे सन् १८०३ त मरण पावले, त्यासमयीं त्यांस राममोहन रायाखेरीज जगमोहन राय नामक एक दुसरा पुत्र होता. कित्येक असें

ह्मणतात कीं राममोहन रायास त्याच्या पित्यानें आपल्या संपत्तीचा कांहींच अंश न देतां, ती सर्व जगमोहनास दिली, आणि तो मरण पावला तेव्हां ती राममोहन रायाकडेस आली. परंतु ही गोष्ट खोटी आहे; त्यास हिस्सा मिळत होता, परंतु त्याणें होऊनच त्याचा नाकार केला. पुढें कांहीं दिवसांनीं बरद्वानचा राजा तेजचंद्र याणें राममोहन रायावर फिर्याद केली; तेव्हां त्याणें बापाच्या संपत्तीचा अंश न घेतल्यामुळें, त्याच्या कर्जाबाबद तो मुळींच जबाबदार नाहीं असा निवाडा झाला

तीर्थरूप आणि बंधु वारल्यानंतर, कुटुंबाचा सांभाळ करणें आणि घरची व्यवस्था राखणें, हें सर्व राममोहन रायावर येऊन पडलें, तेव्हां इंग्रज सरकारांत रोजगार धरावा असें त्याच्या मनांत आलें. परंतु चाकरी धरिली असतांहि आपणास ज्ञान प्राप्त करून घेण्यास कांहीं एक प्रत्यवाय येऊं नये अशी त्याची इच्छा होती. पुष्कळ दिवाणी कामदार त्यास ओळखीत असत; त्याच्या वडिलांनीं मोगलाईत मोठमोठीं कामें चालविलीं होतीं; व त्याची वाकबगिरी आणि बुद्धि ह्या, इंग्लिश सरकारानें मोठ्या हर्षानें त्यास एकाद्या मोठ्या जागेवर नेमावें अशा होत्या; या सर्व गोष्टी अनुकूळ होत्या खऱ्या, परंतु त्या काळीं आतांप्रमाणें, एतद्देशीय लोकांस मोठ्या जागांवर चढण्यास मार्ग मोकळा नव्हता; यामुळें राममोहन रायास

त्याच्या योग्यतेवरून असावा तसा रोजगार मिळणें हें अशक्य होतें.

त्या वेळीं शिरस्तेदारीपर्यंत मात्र हिंदूंस जागा मिळत असत, याच्या वरच्या त्यांस देत नसत. आपणास ही जागा मिळावी अशी राममोहन रायाची इच्छा होती, ह्मणून तो रंगपूर तालुक्याचा कलेक्टर मिस्तर जॉन डिग्बि याच्या हपिसांत प्रथमतः कारकून राहिला. अशी एक चमत्कारिक गोष्ट सांगतात कीं, आमच्या समक्ष तुह्मी उभें राहूं नये, व आह्मी तुह्मास साधारण कामदारप्रमाणें हुकूम करणार नाहीं, असें डिग्बीनें राममोहन रायास लिहून दिलें. यावरून त्या वेळेसच त्याची प्रतिष्ठा किती होती याचें आपण अनुमान करावें. हें काम त्याणें हुशारीनें चालविल्यावरून, डिग्बीनें फार खुश होऊन त्यास लौकरच शिरस्तेदार केला. हें काम कांहीं वर्षें चालविल्यानंतर, पुढें त्याणें वर्षास दहा हजार रुपयांच्या उत्पन्नाची एक जमीन विकत घेतली.*

* एवढ्या लहान पगाराची जागा चालवून राममोहन राय इतकी जमीन विकत घेण्यास समर्थ झाला ही कांहीं अंशीं आश्चर्याची गोष्ट दिसती, आणि त्याच्या प्रमाणिकपणाविषयीं कांहीं संशय येतो; परंतु त्याणें अशा प्रकारची वाईट वर्तणूक केली असें मानण्यास खरोखर आधार कांहींच नाहीं, त्यापेक्षां त्याणें तशी केली नाहीं असें ह्मणणें आपणास भाग आहे. ही जमीन घेण्यास तो कसा समर्थ झाला असेल तो असो.

डिग्बीचें राममोहन रायाशीं जसजसें अधिक संघटन पडत गेलें, तसतसे त्याचे गुण त्याच्या लक्षांत अधिक येऊं लागले. ते दोघे परस्परांचा जो मान राखीत, त्यावरून त्या उभयतांचें परम सख्य पडलें, त्याचा अंत राममोहन राय मरण पावला तेव्हां मात्र झाला. ते दोघे पूर्वेकडील आणि पश्चिमेकडील भाषा शिकण्यांत परस्परांस सहाय्य करीत असत. पुढें मिस्तर डिग्बि इंग्लंडामध्यें असतां राममोहन रायाविषयीं असें लिहितो, कीं

"माझीं सर्व कागदपत्रें लक्षपूर्वक वाचून पाहून, आणि इंग्रज लोकांशीं भाषण व पत्रव्यवहार करून, त्यास इंग्लिश भाषेचें ज्ञान इतकें झालें, कीं तो ती शुद्ध रीतीनें बोलूं व लिहूं लागला. त्यास इंग्लिश वर्तमानपत्रें वाचण्यांची फार आवड असे; आणि त्यांत युरोपांतील राज्यप्रकरणाविषयीं जें लिहिलेलें असे तें वाचून तर त्यास विशेषच आनंद होत असे. त्यांवरून फ्रान्स देशाचा माजी राजा बोनापार्ट याची बुद्धि आणि पराक्रम यांविषयीं त्याच्या मनांत असा विचार भरून गेला, कीं त्यापुढें त्या राजाचीं क्रूर आणि जुलमाचीं कर्में त्यास दिसतनाशींच झालीं; आणि सरतेशेवटीं जी अवस्था त्यास प्राप्त झाली, तिजविषयीं त्यास फारच वाईट वाटलें. परंतु तो दुःखाचा लोट आणि समय गेल्यावर, ज्यामुळें पुढें तो पदच्युत झाला ती त्याची वर्तणूक इतकी अयोग्य असें त्यास वाटूं लागलें, कीं आपण बोनापार्टाची जितकी स्तुति-

केली, तितकीच त्याची निंदा करणें योग्य आहे, असें त्याणें बोलून दाखविलें ".

राममोहन राय, रंगपूर, भागलपूर, आणि रामगड, या जिल्ह्यांत पाळीपाळीनें सन् १८१४ पर्यंत रहात असे. नंतर (सन् १८१४त) कलकत्ता शहरांत त्याणें युरोपियन तऱ्हेचा एक बाग आणि बंगला विकत घेतला. याप्रमाणें, सरकारी काम सोडून धर्म आणि तत्वज्ञान यांच्या अभ्यासांत स्वस्थपणें काळ घालविण्याचा जो त्याचा फार दिवसांचा उद्देश, तो चाळीस वर्षांच्या वयाच्या सुमारास सिद्धीस गेला. त्यास एकांतवासाची इतकी इच्छा झाली होती, कीं तो आपल्या मित्रांजवळ वारंवार असें ह्मणत असें कीं मी जरी आतां वृद्ध झालों आहें, तरी एकाद्या गुहेच्या ठायीं एकांतवास करून, वेदान्त आणि मस्नावी* वाचण्यांत आपला काळ घालवावा, अशी माझी इच्छा आहे. कामकाजाच्या त्रासापासून दूर राहून धर्म आणि तत्वज्ञान यांमध्यें काळ घालविणें, आणि स्वदेशास पुनर्जन्म देण्याच्या महत्कार्याप्रीत्यर्थ आपलें आयुष्य खर्चणें, यांतच राममोहन रायास वास्तविक सुख वाटत असे. मनुष्य, सुधारलेली, अर्धवट सुधारलेली, आणि रानटी, यांतून कोणत्याहि स्थितीमध्यें असला तथापि त्याला कामकाज बहु-

* हा एक, राज्यप्रकरण, नीति, आणि तत्वज्ञान यांवर आरबी भाषेंत लिहिलेला ग्रंथ आहे.

धा सुटत नाहींच, त्यापेक्षां अशा कामकाजानेंच त्याचें अवघें आयुष्य ग्रासावें, हें त्यास फारच अयोग्य वाटत असे. त्याची पक्की खात्री झाली होती, कीं नुसते रुपये सांचविण्यापेक्षां कांहींतरी विशेष योग्य कार्याकरितां महत्‌ज्ञानी परमेश्वरानें मनुष्यास उत्पन्न केलें आहे त्याच्या ठायीं नीतिविचार आणि मानःशक्ति आहेत, त्यांची यथायोग्य सुधारणा आणि प्रफुल्लीकरण झाल्यावांचून, त्याच्या वास्तविक सुखाची वृद्धि व्हावयाची नाहीं; आणि त्याच्या ठायीं असा कांहीं एक गुण आहे, कीं या मृत्युलोकींच्या विषयांनीं त्याचें समाधान होतच नाहीं, आणि अनाद्यंतता, व अनाद्यंततेच्या ठायीं वास करणारा जो परमात्मा त्याची तो निरंतर इच्छा करीत असतो.

राममोहन राय कलकत्त्यांत राहूं लागतांच, बुद्धिवान् आणि शोधक मनाचे असे बहुत तरुण हिंदु त्याच्या भोंवताले जमत चालले; ते सर्व त्या वेळेच्या साधारण लोकांपेक्षां विद्वान् असत. या वेळापासून त्याच्या देशसुधारणुकीच्या क्रमास आरंभ झाला. या काळापासून त्यांणें आपलें सर्व चित्त स्वदेशास पुनः जिवंत करण्याच्या महत्कार्याकडेस लाविलें. रात्रदिवस तो कोठेंहि असला तथापि त्याचे सर्व विचार या कार्याकडेस असत. सारांश, हा महत् हेतु सिद्धीस कसा न्यावा यावांचून त्यांस दुसरें कांहींच सुचेनासें झालें.

पुढें चालू.

राममोहन राय याणें स्वदेशीय लोकांची धर्मसुधारणा करावी ह्मणून फार यत्न केले. ईश्वराच्या गुणाचें मनन करून, आपल्या उत्पन्नकर्त्याची आराधना आत्मभावानें करण्यास त्यांस प्रवृत्त करावें, असा त्याचा मानस होता. हिंदूंतून मूर्तिपूजा नाहींशी करून टाकावी, आणि सर्वशक्तिमान् जगन्नियंता परमेश्वर, सुख, आणि परमार्थ, यांविषयीं सुप्रकाशक विचार त्यांमध्यें प्रसृत करावे, हेंच तो आपल्या जिण्याचें सार्थक मानीत असे; आणि याच्या सिध्यर्थ त्याणें आपली बुद्धि, काळ, आणि धन, या अवघ्यांचा खर्च केला. त्यास जितके अडथळे आले, तितक्या सर्वांचें त्याणें मोठ्या धैर्यानें आणि गांभीर्यानें निवारण केलें. या कार्यार्थ त्याणें द्रव्याचा जो व्यय केला, तो मोठ्या औदार्याचा होता. त्याची संपत्ति ह्मणावी तर ती ह्मणजे फार मोठी होती असें नाहीं, तरीहि तिचा बहुत मोठा अंश त्याणें या कार्यास लाविला. याच्या सारिखी उत्कंठा बाळगून श्रम घेणारा असा दुसरा सुधारणारा विरळाच झाला असेल; गृहस्थपणा, विद्वत्ता, लोकप्रीति, लीनता, उत्कंठा आणि स्वतंत्रता, हे सर्व गुण याच्या ठायीं जसे एकत्र झाले होते तसे दुसऱ्या थोड्याच सुधारणारांमध्यें होते असतील. असा हा योग्य आणि प्रतापी पुरुष होऊन गेला.

राममोहन राय याणें हिंदूच्या मनास अनुचित धर्म-बंधनांतून मुक्त करून, त्याच्याठायीं न्याय, सत्य, परोपकार, नीति, ईश्वरभक्ति इत्यादिकांविषयीं अधिक स्वच्छ आणि उच्च विचार बिंबवून देण्यास जे यत्न व उपाय केले, त्या सर्वांची गणना करणें कठीण आहे. याच हेतूनें, नीतीवर व धर्मावर लहान लहान पुस्तकें पदरच्या खर्चानें छापून, त्याणें तीं स्वदेशीय लोकांस फुकट वांटिलीं.

प्रथमतः त्याणें वेदान्ताचें बंगाली भाषांतर करून छापिलें. आमच्या सर्व वाचणारांस ठाऊकच असेल, कीं वेदान्त ह्मणजे वेदांचें आणि हिंदु धर्माचें सार होय. परंतु तो अति कठीण संस्कृतांत असल्यामुळें, साधारण व बहुतेक हिंदूंस समजत नाहीं; याजकरितां त्याचें बंगाली-मध्यें भाषांतर केल्यामुळें, त्याणें आपलें कार्य सिध्धीस नेण्यास बहुत सहाय्य केलें असें झालें. बंगालीनंतर त्याणें त्याचेंच एक हिंदुस्थानी भाषांतर करून छापिलें; आणि शेवटीं सन् १८१६त वेदान्ताचें इंग्लिश भाषांतर करून छापिलें. या ग्रंथास त्याणें जी प्रस्तावना लिहिली आहे ती फार सुंदर आणि मनोरंजक असून, त्याच्या उद्देशांचा आणि मतांचा चांगला बोध करण्याजोगी आहे, याजकरितां आह्मी ती येथें उतरून घेतों. तिजमध्यें तो असें ह्मणतो कीं :–

" बहुतेक ब्राह्मण आणि इतर जातींचे हिंदु जी मूर्तिपूजा करितात, तिचें प्रतिपादन करण्यास ते अगदीं असमर्थ आहेत. तिजविषयीं त्यांस प्रश्न केला असतां, सयुक्तिक रीतीनें भाषण करायाचें टाकून, आमच्या वाडवडिलांनीं याप्रमाणें केलें ह्मणून आह्मी करितों असें ह्मणतात, आणि हेंच तिच्या खरेपणाविषयीं प्रमाण पुरे आहे असें मानितात; आणि मी, मूर्तिपूजेचा त्याग करून, खऱ्या आणि अनाद्यंत परमेश्वरासच भजूं लागलों ह्मणून त्यांतून कित्येक मजवर अतिशय रुष्ट झाले आहेत. याजकरितां आपलीं स्वतःचीं आणि आपल्या पूर्वजांचीं धर्ममतें, यांच्या प्रतिपादनार्थ, मी कांहीं दिवसांपासून, आमच्या पवित्र ग्रंथांचा वास्तविक अर्थ आपल्या देशबंधूंस समजावून, त्याविषयीं, आणि कित्येक अविचारी मनुष्य मला जे दोष लावितात ते अगदीं निरर्थक आणि अनुचित आहेत याविषयीं, त्यांचीं खात्री करून देण्यास यत्न करीत आहें.

" वेद हे हिंदूंचीं सर्व शास्त्रें होत. ते पृथ्वीच्या उत्पत्तीच्या वेळेचे आहेत असें ह्मणतात. ते फारच मोठे ग्रंथ असून, अति कठीण आणि लाक्षणिक भाषेंत लिहिलेले असल्यामुळें, बहुत स्थळीं गोंधळलेले आणि परस्परांस विरुद्ध आहेत असें दिसण्यांत दिसून येतें. या सर्व अड-

चणी ध्यानांत आणून, महा व्यासानें सुमारें दोन हजार वर्षांपूर्वी त्या सर्व ग्रंथांचा एक संक्षेपरूप ग्रंथ रचिला, आणि जे भाग परस्परांस विरोध आणणारे असे दिसले तेहि टीका करून मिळवून घेतले. या ग्रंथास वेदान्त ह्मणजे वेदांचा अंत किंवा सार असें ह्मणतात. त्याला सर्व हिंदु फार मान देत असतात; आणि विस्तीर्ण वेदांच्या जागीं त्याजवरच गरज करितात. परंतु तो संस्कृत भाषेंत असल्यामुळें, आणि ब्राह्मण आपणाखेरीज दुसऱ्या कोणास तो वाचायास तर काय, परंतु त्यास स्पर्श करायास देखील देत नाहींत याजमुळें, वेदान्ताचा आधार जरी वारंवार घेतात तरी तो साधारण लोकांस थोडाच माहीत आहे, किंबहुना नसल्यासारिखाच आहे; आणि थोड्याच हिंदूंचें आचरण वेदान्तांतील मतांस अनुसरून असतें.

"वर सांगितल्याप्रमाणें, आपल्या स्वतःच्या आणि आपल्या पूर्वजांच्या मतांच्या प्रतिपादनार्थ, मी यथाशक्ति ह्या आजपर्यंत अज्ञात ग्रंथाचीं संक्षेपरूप हिंदुस्थानी आणि बंगाली भाषांतरें करून छापिलीं, आणि त्यांच्या प्रतींचा प्रसार स्वदेशीय लोकांत आपल्याकडून झाला तेवढा केला. सध्याचें हें त्याचेंच संक्षेपरूप इंग्रेजी भाषांतर आहे; हें करण्यांत माझा उद्देश एवढाच, कीं ज्या अज्ञान समजुतींनीं आणि देवभोळेपणानें सांप्रत हिंदु धर्माचें स्वरू-

प इतकें बिघडलें आहे, त्यांशीं आणि त्याच्या शुद्ध मूलतत्वांशीं कांहीं संबंध नाहीं, हें माझ्या युरोपिअन मित्रांस पक्कें समजावें.

" मीं असें पाहिलें आहे, कीं युरोपिअन लोक लिहिण्यांत आणि भाषणांतहि हिंदु मूर्तिपूजेच्या स्वरूपाकडेस सौम्य दृष्टीनें पाहूं इच्छितात; आणि कोणत्याहि पदार्थांची पूजा करणें तर ते पदार्थ ईश्वराच्या प्रतिमा आहेत असें मानून लोक करितात, अशी आपल्या मनाची समजूत घालितात. असा प्रकार आहे असा जर कांहीं संभव असता, तर मी त्याविषयीं कांहीं अधिक शोध केला असता; परंतु वास्तविक प्रकार असा आहे, कीं सांप्रतकाळीं हिंदूंची अशी कांहीं समजूत नसून ते उलटें असें मानितात, कीं देव कोट्यावधि आहेत, व त्यांतून प्रत्येकास आपापल्या लोकीं स्वतंत्र अधिकार आहे, आणि खऱ्या परमेश्वराची नव्हे, तर ऱ्या देवांची भक्ति करण्यास देवळें बांधितात आणि पूजा अर्चादि कर्में करितात. असें आहे तथापि हीं सर्व कर्में मुळचीं लाक्षणिक रीतीनें ईश्वराची भक्ति करण्याच्या मार्गापासून उत्पन्न झालीं आहेत यांत कांहीं संशय नाहीं. परंतु सध्या हें सर्व लोक विसरले आहेत, आणि जो कोणी असें ह्मणतो त्यास नास्तिक ह्मणायासहि सोडीत नाहींत. इतर मनुष्यांच्या मतांवर स्वमतांचें वर्चस्व स्थापण्यास मी

इच्छितों असें यावरून कोणीं समजूं नये. तशा विषयावर कितीहि वादोपक्रम झाला तथापि अंतीं त्याचा परिणाम समाधानकारक होईल असें नाहीं. कारण मनुष्यास आपल्या बुद्धिशक्तीच्या आंत ज्या गोष्टी आहेत त्यांविषयीं जरी तिच्या योगें निर्णय करितां येतो, तरी तिच्या पलीकडल्या ज्या आहेत त्यांत त्याची मति चालत नाहीं. मी येथें एवढेंच सुचवितों, कीं सारासार विचार व आपली सामान्य बुद्धि यांवरून, या ब्रह्मांडाचा पालनकर्ता व नियंता कोणी तरी ज्ञानसंपन्न आणि अनादि आत्मा आहे, असें जर आपणास वाटतें, तर तो सर्वशक्तिमान् आणि सर्वांहून श्रेष्ठ आहे, व त्यास पुर्नेपणें जाणणें किंवा त्याचें वर्णन करणें हें आपल्या सामर्थ्यापलीकडे आहे, असेंहि आपणास मानिलें पाहिजे; आणि जरी अशिक्षित व कित्येक शिक्षितहि ( परंतु या एका प्रकरणांत दुरभिमानानें अंध झालेले ) मनुष्य, आपणास नेहमी प्रत्यक्ष दिसणारा आणि इंद्रियगोचर अशा कोणत्या एकाद्या आपल्या मनास येईल त्या पदार्थाची पूजा करितात, तरी त्यामुळें अशा त्यांच्या वर्तणुकीचें मूर्खत्व तिळमात्र कमी होतें असें नाहीं.

"मूर्तिपूजेवरून उपस्थित झालेले आणि तत्संबंधी जे मनुष्याच्या कल्याणास प्रतिकूल किंबहुना अपकारक आचार त्यांवर मी निरंतर विचार करीत असतां,

आणि मला आपल्या देशबांधवांची करुणा येती ह्मणून, त्यांस त्यांच्या अज्ञानरूप स्वमावस्थेंतून जागृत करण्यास आणि आपल्या वास्तविक शास्त्राचें परिज्ञान करून देऊन सृष्टीचा उत्पन्नकर्ता जो सर्वशक्तिमान् परमेश्वर त्याचीच सद्भावें करून आराधना करायास लावण्यास, आपली पराकाष्ठा केल्यावांचून माझ्यानें रहावत नाहीं

"मी ब्राह्मण होत्साता, आपल्या सदसद्विचारबुद्धीनें जो चांगला मार्ग मला दाखविला तो म्या धरिला यामुळें, माझे अप्तविषयी जे पराकाष्ठेचे दुरभिमानी आणि सध्याच्या धर्ममार्गांत ज्यांचा स्वार्थ आहे, त्यांच्याहि निंदेस आणि अपमानास आपणास पात्र करून घेतलें; परंतु हे त्रास कितीहि असले तथापि मी शांतपणें सहन करितों; आणि अशी आशा बाळगितों कीं जेव्हां लोक माझ्या आतांच्या श्रमाची कृतज्ञतापूर्वक स्तुति करितील, असा सुदिन भरतखंडास लौकरच येईल. असो, मनुष्यें काय पाहिजे तें ह्मणोत, हा समाधानकारक विचार तर त्यांच्यानें मजपासून हिरावून घेववत नाहीं; जो गुप्तपणें पहातो आणि उघडपणें प्रतिफळ देतो, त्या भगवंतास माझे विचार मान्य होतील."

वेदान्तानंतर, राममोहन राय याणें, केनोपनिषदावर शंकराचार्यानें केलेल्या टीकेच्या आधारानें त्या उपनिषदाचें भाषांतर करून, बंगाली आणि इंग्लिश भाषांत छापिलें.

केनोपनिषद हें सामवेदाचा एक भाग आहे. ईश्वर अद्वैत व सर्वशक्तिमान् आहे, आणि तो मात्र पूजा करण्यास योग्य, हें त्यांत स्थापिलेलें आहे कर्मकांड आणि ज्ञानकांड असे वेदाचे दोन भाग आहेत; पहिल्यांत पंच महातत्वांची पूजा व यज्ञयागादि कर्मैं सांगितलीं आहेत; दुसऱ्यांत ईश्वराच्या गुणाचें स्तवन करून त्याचें अस्तित्व प्रतिपादन केलें आहे. उपनिषदें या दुसऱ्या भागांत आहेत. या उपनिषदाचें भाषांतर करण्याचा हेतु इतकाच, कीं कर्मकांडांत सांगितलेलीं वेडवेडीं कर्मैं, आणि पुराणांत सांगितलेल्या पूजाअर्चा हीं सर्व, वेदांचा उत्तम आणि अति निर्दोष भाग जीं उपनिषदें, त्यांत सांगितलीं नाहींत एवढेंच नाहीं, तर त्यांचा निषेध केल्यासारिखें आहे.

राममोहन राय याणें ईश्वर अद्वितीय आहे, द्वितीय नाहीं, हें वेदान्ताचें मुख्य मत असें लोकांस दाखवून देण्यास बहुत यत्न केले. त्याणें सामोपनिषदाच्या भाषांतरास जी प्रस्तावना लिहिली आहे, तींत तो असें ह्मणतो, कीं देव एकच आहे असें जें हिंदु धर्माचें वास्तविक मत तें लोकांस समजून, त्यांमध्यें त्याविषयीं ज्या वेड्या समजुती आहेत त्या सर्व नाहींशा होतील, आणि तसेंच वेदाचा कोठकोठे लाक्षणिक अर्थ घ्यावा लागतो हें त्यांस माहीत होऊन, ज्यांहीं करून सांप्रतकाळीं हिंदु प्रपंचाचीं

जीं साधारण सुखें त्यांस मुकले आहेत इतकेंच नाहीं, तर आपल्या स्वतःच्या, आपल्या मित्रांच्या आणि आप्तांच्या प्राणांचा नाश करण्यासहि प्रवृत्त होतात, असे जे कित्येक आचार ते अगदीं टाकून देतील अशी मी अपेक्षा करितों."

आपल्या स्वदेशीय लोकांस, त्यांच्याच धर्मशास्त्रांतील सुयुक्त आणि वास्तविक मतांचें परिज्ञान करून देऊन, मूर्तिपूजेपासून मुक्त करण्याचा जो त्याचा मानस, त्यास अनुसरून त्याणें, यजुर्वेदांतील कथोपनिषद आणि अथर्ववेदांतील मुंडकोपनिषद, यांचीं बंगाली आणि इंग्लिश भाषांतरें करून, त्यांचा आपणाकडून झाला तेवढा लोकांमध्यें प्रसार केला.

हे ग्रंथ छापिल्यामुळें लोकांत फार गवगवा झाला. स्थापित आणि सध्या चालू असा हिंदुधर्म नष्ट करणारीं मतें राममोहन रायानें प्रसिध्ध केलीं; त्याणें व त्याच्या मित्रांनीं विचार करण्याची आणि त्याप्रमाणें वर्तण्याची मोकळीक उघडपणें घेतली, यामुळें शास्त्री, पंडित व दुसरे दुराभिमानी लोक, यांच्या पोटांत मोठी धास्ती पडली. ब्राह्मणांखेरीज इतरांस वाचण्याचा व ऐकण्याचाहि अधिकार नाहीं असे जे वेद आणि उपनिषदें तीं शिव, विष्णु, खंडोबा, दुर्गा, मारुती, इत्यादिक देवांच्या उपासनेचा निषेध करितात, हें सर्व लोकांस माहीत होत चाललें. शास्त्र आ-

पण एकट्यांनींच पढण्याचा जो ब्राह्मणांचा अधिकार, तोहि त्यांपासून हिरावून घेतला गेला असें झालें. आजपर्यंत ( अजूनहि मुंबईंत आहे त्याप्रमाणेंच त्या वेळीं बंगाल्यांत ) साधारण व बहुतेक हिंदूंस, शास्त्रांत अमुक आहे असें ब्राह्मण सांगतील तें ऐकून घेऊन, समाधान मानावें लागत असे; यापलीकडे शास्त्राचें वास्तविक ज्ञान थोड्यांसच असे; परंतु राममोहन राय याणें शास्त्र वाचण्यास आणि "ओम्" शब्द उच्चारण्यासहि त्यांस मार्ग मोकळा करून दिला. यावरून तो कोणत्या पक्ष्यास जाणार याचें कांहींच अनुमान लोकांस होईना. जेथें पहावें तेथें राममोहन रायाविषयीं गोष्टी चालल्या आहेत असें झालें. ब्राह्मणापासून तों शूद्रापर्यंत सर्व जातींचे लोक या सुधारणाराच्या यत्नांस प्रतिबंध करण्यास एक झाले. आपसांत नेहमी कलह करीत बसणारे, आणि पैशापलीकडे कशाचीहि काळजी न बाळगणारे, असे जे भट, भिक्षुक, जोशी, उपाध्ये, त्या अवघ्यांनीं या आपल्या सर्वांच्या शत्रूवरावर टक्कर मारण्यास कंबर बांधिली.

उपनिषदें छापिल्यावरून, आणि इंडिया ग्याझेट नामक वर्तमानपत्राच्या कर्त्यानें राममोहन राय यास "सुधारणारा" व "शोधून काढणारा" अशीं अभिधानें दिल्यावरून, तो व मद्रासेंतील इंग्लिश शाळेचा मुख्य शिक्षक शंकर शास्त्री, या उभयतांमध्यें धर्मसंवाद चालू झाला. वेदान्ताप्रमाणें, व

पुराणप्रमाणेंहि, कोणा एका अर्थी, ईश्वर एकच आहे, हें त्या शास्त्र्यानें कबूल केलें; परंतु तो असें ह्मणे, कीं राममोहन रायास हें मत आपण शास्त्रांतून शोधून काढिलें असें ह्मणून घेण्यास कांहीं अधिकार नाहीं. इतकें असूनहि पुनः मूर्तिपूजा असावी, व ईश्वराचे अनेक गुण एकमेकापासून भिन्न आणि स्वतंत्र आहेत असें मानून त्यांच्या प्रतिमा करून पुजाव्या, असें तो ह्मणे. हें सिद्ध करण्यास तो असे दृष्टांत देई :—जर कोणा मनुष्यास राजास भेटण्याची इच्छा असली, तर त्यास पहिल्यानें प्रधानाची भेट घेतली पाहिजे; नाहीं तर एकदम राजाकडे जांईन ह्मणेल तर राजास क्रोध येईल; तसेंच कोणा मनुष्यास दादर चढायाचा असल्यास, त्याची एकेक पायरी चढत गेलें पाहिजे, नाहींतर एकदम सातआठ चढेंन ह्मणेल तर पाय मोडून घेईल. तद्वतच ईश्वराची कृपा, त्याच्या गुणांची पूजा प्रथमतः करून, हळुहळु संपादन करीत गेलें पाहिजे. यास राममोहन रायानें लौकरच उत्तर दिलें, त्यांत त्याणें "सुधारणारा" व "शोधून काढणारा" या पदव्यांवरला आपला दावा अगदीं सोडून दिला, आणि तो असें ह्मणाला कीं आपणास सुधारणारा असें ह्मणून आपले लोक आपली निंदा करितात. वेदान्तांतील पुष्कळ आधार दाखवून देऊन, त्याणें असें स्थापन केलें, कीं ईश्वराचे गुण एकमेकापासून भिन्न आणि स्वतंत्र आहेत हें मत, वेदांन्तातील मुख्य मतांशीं अगदीं विरुद्ध आहे. यानंतर लौकरच भट्टाचार्य नामक

कलकत्त्यांतील एका गृहस्थानें बंगाली आणि इंग्लिश भाषां-
मध्यें एक लहानसें पुस्तक छापून, त्यांत राममोहन रायाच्या
मतांवर बहुत हल्ले केले; परंतु त्यांचेंहि त्याणें यथायोग्य
खंडन केलें

परंतु राममोहन रायास ज्या प्रतिबंधांशीं झुजावें लाग-
लें, ते सर्व केवळ बुद्धिबळाचेच होते असें कोणीं समजूं नये;
कांहींसा छळणेसारिखा प्रकारहि त्याणें अनुभविला, तो सह-
न करायास आंगीं किती धैर्य लागलें असावें याची कल्पना-
सर्व करूं शकतील. राममोहन रायाचे स्वदेशीय लोक (हिंदु)
त्याच्या श्रमांचें मोल जाणण्यास इतके असमर्थ किंवा दुर-
भिमानेंकरून इतके अंध होऊन गेले होते, कीं त्यांणीं त्या-
स नास्तिकहि ह्मणायास सोडिलें नाहीं; तो स्वतःअभक्त अ-
सून सर्व धर्म नष्ट करूं पहातो असें ते ह्मणूं लागले. शेवटीं
त्यांणीं त्यास इतक्या संकटांत आणि काळजींत पाडिलें,
कीं बाहेर जातेवेळीं आपल्या गाडीबराबर नेहमी पहारा
बाळगणें त्यास भाग झालें. राममोहनरायास हिंदु नास्तिक
ह्मणत, यांत कांहीं फारसें आश्चिर्य आहे असें नाहीं. साधार-
ण लोक, बहुधा शुद्ध एकदेवमत आणि नास्तिकमत यांत भेद
न राखितां, जो कोणी आपल्या लोकांच्या अज्ञान समजुतीं-
प्रमाणें किंवा धर्माप्रमाणें चालत नाहीं, त्यास नास्तिक
ह्मणतात. कुराण जो कोणी मानीत नाहीं त्यास मुसलमान ना-

स्तिक ह्मणतात. बैबल ह्मणजे ख्रिस्ती धर्मशास्त्र जो मानीत नाहीं, त्यास ख्रिस्ति लोक नास्तिक ह्मणतात. त्याप्रमाणेंच, जो कोणी शिकलेला हिंदु, हिंदुधर्म ह्मणजे मूर्तिपूजा करीत नाहीं, त्यास त्याचे लोक नास्तिक ह्मणतात.

राममोहन राय, ख्रिस्ती धर्मशास्त्राच्या व्यवहारांत उपयोगीं पडणारा जो भाग, त्यास फार मानवीत असे. ख्रिस्ती धर्मांतील नीति तो बहुत वाखाणीत असे. ख्रिस्ती शास्त्र मूळभाषेंत वाचून पहावें, ह्मणून त्याणें ग्रीक व हिब्रु या भाषांचा अभ्यास केला. सन् १८२० सांत त्याणें ख्रिस्ती शास्त्रांतून कित्येक निवड वेंचे घेऊन, त्यांचें एक निराळें पुस्तक छापिलें; त्याचें नाव "येशूच्या आज्ञा ह्मणजे सुखाचा व शांततेचा मार्ग." या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत तो असें ह्मणतो कीं—

"ज्या भगवंतानें, जाति, पदवी, आणि संपत्ति यांचा भेद न राखितां, सर्व प्राणिमात्रांस एकीकडून सुख, दुःख, मरण इत्यादि फेरफारांस एकसारिखें पात्र केलें आहे, आणि त्या सर्वांस सृष्टींतील सुखें भोगण्यास एकसारिखा अधिकार दिला आहे, त्याविषयीं उच्च विचार व बहुमान मनुष्यांच्या मनांत बिंबवून देण्यास, आणि उत्पन्नकर्त्याविषयीं, स्वतः विषयीं, आणि इतर जनांविषयीं आपलीं कर्तव्य कर्में समजण्यास, हा लहानसा नीतिग्रंथ इतका उपयोगीं आहे, कीं तो छापिल्यापासून कांहीं तरी चांगला परिणाम झा-

त्यावांचून रहाणार नाहीं अशी माझी पक्की खात्री आहे."

हा ग्रंथ छापितांच, फ्रेन्ड आव् इंडिया या पत्राच्या कर्त्यानें आपल्या पत्रांत, त्याच्या प्रस्तावनेंतलि कित्येक मतांच्या खंडनार्थ, कांहीं मजकूर लिहिला.* यास राममोहन रायानें "खिस्ती लोकांस विनंति" ह्मणून एक लहानसें पुस्तक छापून त्यांत " सत्याचा मित्र" अशी सई घालून उत्तर दिलें. त्याजवर त्या पत्रकर्त्यानें पुनः लिहिलें; त्यासहि त्याणें आपली "खिस्ती लोकांस दुसरी विनंति" हिच्या द्वारें स्वतःची सई घालून उतर दिलें. परंतु त्या पत्रकर्त्यानें तिसऱ्या वेळीं त्यावर हल्ला केला. पाहिलीं दोन विनंतिपत्रें श्रीरामपूर छापखान्यांत छापिलीं होतीं; परंतु त्या छापखान्याचा धनी त्याचें तिसरें आणि सरशेवटलें विनंतिपत्र छापण्यास

---

याचें कारण असें दिसतें, कीं राममोहन राय याणें खिस्ती शास्त्र ग्रीक व हिब्रु भाषांत वाचून पाहिल्यावर, त्याचा खिस्ती लोक साधारण रीत्या जो अर्थ करितात, त्यापासून कांहींसा भिन्न अर्थ तो करूं लागला. त्याची अशी खात्री झाली कीं त्यांत शुद्धएकदेवमत आहे. त्याचा एक विद्वान् खिस्ती मित्र रेवरेन्ड विल्यम आदम ह्मणून होता, त्याचीहि तशीच खात्री होऊन, तो शुद्धएकदेवमताचा उपदेशक झाला. त्याणें खिस्ती शास्त्राविषयीं आपलीं अशीं कांहीं मतें त्या प्रस्तावनेंत प्रगट केलीं असतील. त्याणें याप्रमाणें खिस्ती शास्त्राचा भिन्न अर्थ केला तो खरा असो किंवा नसो, परंतु त्यावरून इंग्लिश लोकांचीं मनें दुखविलीं जाऊन, त्यांमध्यें आपली मान्यता उणी होईल हें पुरें त्याच्या लक्षांत वागत असतां, त्याणें तो प्रगट केला, यावरून त्याच्या मनाची स्वतंत्रता आपणास दिसून येती

अनमान करूं लागला, तेव्हां राममोहन रायानें स्वतः एक प्रेस ह्मणजे छापण्याचें यंत्र विकत घेतलें, आणि त्यांत तें छापिलें. त्याणें पुढें जे ग्रंथ केले, ते सर्व याच छापखान्यांत छापिले.

सुमारें त्याच वेळीं, राममोहनरायाविषयीं युरोपियन आणि हिंदु या दोनहि लोकांमध्यें गवगवा झालेला असतां, वृजमोहन मुजंधर ह्मणून त्याचाच एक शिष्य व मित्र होता, त्याणें "हिंदु एकदेवमत" यावर एक ग्रंथ बंगाली भाषेंत छापून प्रसिद्ध केला. परंतु या ग्रंथांतील भाषेच्या शैलीवरून आणि विचारांवरून, कित्येकांचें असें मत आहे, कीं तो राममोहनरायानें स्वतः किंवा किमानपक्षीं त्याच्या सहाय्यानें तरी केलेला असावा. त्यांत मूर्तिपूजेवर मोठा कहर केला आहे. ग्रंथकर्त्यास शास्त्राचें बहुत ज्ञान होतें असें दिसून येतें. आजकाळीं बंगाली भाषेंत तो पहिल्या प्रतीचा ग्रंथ आहे असें ह्मणतात.

आपल्या देशांतून मूर्तिपूजा नष्ट करून टाकून, तिच्या जागीं तिजहून चांगल्या धर्माचा व नीतीचा फैलावा करण्यास्तव राममोहनरायानें प्रयत्न केल्यामुळें, त्याचे बहुतेक साधारण स्वदेशीय लोक जरी त्यावर रुष्ट झाले तरी, जे विचारशील हिंदु होते ते, त्याचे श्रम जाणून, ते सफळ व्हावे अशी इच्छा करूं लागले. मूर्तिपूजा न करणाऱ्या लोकांचा समुदाय दिवसेंदिवस वाढत चालला. विद्वान्

प्रतिष्ठित, आणि संपत्तिमान् अशा पुष्कळ गृहस्थांनीं राम-मोहनराय याचीं मतें स्वीकारिलीं. त्यांतून बाबु प्रसन्न-कुमार ठाकूर वगैरे कित्येक गृहस्थ हल्लीं कलकत्त्यांत हिं-दूंमध्यें प्रमुख आहेत. त्यांतला दुसरा एक, द्वारकानाथ ठा-कूर, ( प्रसन्नकुमाराचा भाऊ, ) हा तर बहुतेकांस ठाऊकच असेल. तो कांहीं वर्षांवर युरोप खंडास जाऊन येऊन मुंबईस आला होता, आणि येथें मयत शेट फ्रामजी कावसजी यां-च्या बंगल्यांत उतरला होता. तो मरण पावून थोडींच वर्षें झालीं. राममोहनरायानें एका लेखामध्यें असें ह्मटलें आहे, कीं आपण हिंदुधर्मास प्रतिबंध करण्याच्या वाटेस तर कधीं गेलों नाहीं; परंतु शास्त्राचा वास्तविक अर्थ लो-कांस समजावून देऊन, ब्राह्मणांची मूर्तिपूजा आणि वेड-वेडीं अनुचित कर्में हीं, त्यांच्या पूर्वजांच्या आचरणास. आणि ज्या पुरातन ग्रंथांस ते आह्मी मानितों असें ह्मणता-त; त्यांतील मतांस केवळ विरुद्ध आहेत, अशी लोकांची खात्री करण्यास मी यत्न केले. प्रथमतः मला बहुत प्रतिबंध झाला खरा, परंतु लौकरच पुष्कळ प्रतिष्ठित आ-णि विद्वान् गृहस्थ मला येऊन मिळाले. या गृहस्थांस; आपल्या लोकांचा अज्ञान देवभोळेपणा, वेड्या समजुती आणि अनुचित व कोठकोठें क्रूरहि असे आचार, यांमुळें आजपर्यंत त्यांची किती हानी झाली, व हाल्लीं होत आहे, हें चांगलें समजलें होतें, ह्मणून त्या अवघ्यांचा विध्वंस करण्यास ते मोठ्या हर्षानें राममोहनरायांस जाऊन मिळाले.

त्यांणीं लौकरच, देव अनेक नाहींत, एकच आहे, अशा मताभिमानी लोकांची एक मंडळी सन् १८२२ त उपस्थित केली, आणि तिचें नाव " ब्राह्म समाज " ठेविलें. ही मंडळी अद्यापिहि कलकत्त्यांत चांगल्या रीतीनें चालली आहे. तिची सभा प्रत्येक बुधवारीं संध्याकाळीं भरती, त्या वेळीं वेद वाचून त्यांचा अर्थ सांगतात, आणि धर्मसंबंधीं व नीतिसंबंधी विषयांवर बंगाली भाषेंत व्याख्यानें देतात. सर्व जातींच्या व धर्मांच्या लोकांस सभेस येण्याची मोकळीक असल्यामुळें पुष्कळ मंडळी जमत असती. सभा विसर्जन होण्याच्या समयीं गायत्री व राममोहन रायानें आणि त्याच्या मित्रांनीं केलेलीं गीतें गातात. आपला उद्देश सिद्धीस नेण्यास त्यांणीं आणखी एक उपाय योजिला तो हा, कीं नीतिविषयावर व धर्मविषयावर बंगाली भाषेंत लहान लहान पुस्तकें आणि वेदान्तावर संस्कृत ग्रंथ वारंवार छापून ते प्रसिद्ध करावे.

ही मंडळी स्थापिल्यामुळें लोकांत जो गवगवा झाला तो तर काय पुसायाचा आहे ! वेदादि हिंदु धर्माचे अति पवित्र जे भाग आज हजारो वर्षांपासून गुप्त ठेविलेले होते ते एकदम उघडे करून, त्यांस स्पर्श करण्यास देखील अधिकार नाहीं अशांकरवीं ते वाचविणें; शूद्र तर काय, परंतु म्लेंच्छांसमक्ष देखील गायत्रीचा उच्चार करणें; आणि शूद्र व म्लेंच्छ यांच्या करवीं ब्रह्माची पूजा करविणें;

या गोष्टींवरून सर्व दुरभिमानी हिंदूंस फार क्रोध येऊन, ब्राह्म दळाच्या प्रयत्नास कोणत्या तरी उपायेंकरून मजबूत प्रतिबंध होईल अशी कांहीं तजविज योजणें त्यांस भाग पडलें. मूर्तिपूजेचें ब्राह्म समाजापासून हरएक प्रकारें रक्षण करण्याच्या उद्देशानें त्यांणीं "धर्मसभा" स्थापिली. ही सभा मोठ्या त्वरेनें वाढत गेली. सर्व खटल्यांपासून दूर रहाण्याचा आणि कोणत्याहि कार्यार्थ आपणामध्यें ऐक्यभाव न करण्याचा जो हिंदूंचा जातिस्वभाव, तो या प्रसंगीं पालटला असा दिसला. सर्व बंगालभर धर्मप्रकरण पसरलें. ब्राह्मसभापक्ष आणि धर्मसभापक्ष, असे हिंदूंमध्यें दोन तट पडले. जेथें पहावें तेथें या सभांचें युध चालले आहे असें झालें. कधींकधीं धर्मसभा ब्राह्म सभेच्या वेदान्तावर जय पावली असें दिसून येई; पुनः, ब्रह्मज्ञान्यांनीं सर्व धर्मपक्षाचा मोड करून टाकिला, असेंहि पुष्कळ वेळां घडून येई.

ह्या धर्मसभेचें वजन आणि बळ हीं प्रथमतः फार वाढलीं होतीं, तथापि ईश्वरी कृपेनें लौकरच तीस उतरती कळा लागली, आणि आतां तर ती मुळींच रसातळास गेली. बहुतेक शिकलेले तरुण हिंदु असल्या सभेचा लौकर मोड झाला ह्मणून हर्ष मानीत असतील यांत कांहीं संशय नाहीं. ह्या सभेनें पहिल्यानेंच एक मोठा पराक्रम केला तो हा, कीं सति जाण्याची चाल बंद करूं नये, ह्मणून तिणें सर-

कारास एक अर्जी केली; आणि नंतर, कोणी मनुष्य स्वधर्माचा त्याग करील तर त्याच्या वडिलांच्या मालमत्तेवर त्याचा वारसा चालूं नये असा कायदा असावा, ह्मणून एक दुसरी अर्जी केली.

ज्या सति जाण्याच्या चालीचा धर्मसभेनें इतका कैवार घेतला होता ती, आपल्या देशांत ज्या कित्येक अति निर्दय आणि राक्षसरूपी चाली आहेत, त्यांतलीच एक होती. तिजमुळें बिचाऱ्या लक्षावधि स्त्रिया अकाळीं काळाच्या तोंडीं पडत असत: परलोकीं निरंतर सुख प्राप्त होईल या आशेनें, त्या आपल्या भ्रतारांच्या प्रेतांबरोबर आपणास दहन करून घेत. राममोहन रायास त्यांची ही दुःखकारक स्थिति पाहून फार करुणा येत असे. सन् १८२० त त्याणें, एक सति जावें या पक्षाचा, आणि दुसरा सति जाऊं नये या पक्षाचा, अशा दोन पुरुषांमध्यें संवाद चालला आहे, अशा भावार्चे एक पुस्तक बंगाली भाषेंत छापून पदरच्या खर्चानें प्रसिध्द केलें, आणि त्याच्या प्रति लोकांस फुकट वांटल्या. त्यानंतर लौकरच तसाच एक दुसरा संवादरूप ग्रंथ छापून प्रसिध्द केला. हे ग्रंथ छापण्यांत त्याचा हेतु एवढाच, कीं लहान सहान ग्रंथकारांनीं सति जावें असें जरी कोठकोठें ह्मटलें आहे, तरी मनू-

नें सति जावेंच असें कांहीं साफ लिहिलें नाहीं, आणि वेदांत तर तिचा निषेध केला आहे. या संवादांनीं सति बंद करण्यास मार्ग मोकळा केला. ती बंद करण्याची आवश्यकता सरकारच्या लक्षांत १८०५ तच आली होती, परंतु तसें केलें असतां हिंदु धर्मास प्रतिबंध केल्यासारिखें होईल असें समजून, तिजविषयीं यापूर्वी कांहीं झालें नव्हतें.

संवादांवरून हा संशय दूर झाला; आणि सन् १८२९ या वर्षाच्या अखेरीस, लॉर्ड विल्यम बेन्टिक, हिंदुस्थानचे गवर्नर जनरल, यांणीं ही क्रूर व लाजीरवाणी सति जाण्याची चाल बंद करण्याचें यश घेतलें. धर्मसभेनें वर सांगितलेली अर्जी जेव्हां सरकारांत पाठविली, तेव्हां राममोहन रायानें आपण पुढें होऊन, त्या वेळेच्या सुशिक्षित हिंदूंच्या एका पत्रावर सह्या घेतल्या, आणि तद्वारें, आपल्या देशाच्या चिरकाळ कल्याणाची जी ही गवर्नर जनरल साहेबांनीं गोष्ट केली तिजकरितां आपण फार आभारी झालों, असें दर्शविलें. आतां, यांवरून हें सिद्ध होतें, कीं ही निर्दय आणि मनुष्यजातीस लांच्छन आणणारी सति जाण्याची चाल नष्ट होण्यास राममोहन राय हा मुख्य कारण होय. स्वदेशीय स्त्रियांची स्थिति सुधारण्यास आणि त्यांस सुखी करण्यास त्याणें जे श्रम केले,

त्यांची स्तुति करावी तितकी थोडीच.

कलकत्त्यांतील जनरल आसेंब्लीची शाळा ज्याणें स्थापिली, तो गृहस्थ सन् १८३० सांत प्रथमतः हिंदुस्थानांत आला; तेव्हां त्याची आणि राममोहन रायाची भेट होऊन, शाळा स्थापून एतद्देशीय मुलांस विद्या शिकविण्याचा जो त्याचा उद्देश, त्याविषयीं त्या उभयतांमध्यें कांहीं संभाषण झालें. त्यासमयीं राममोहन रायानें त्याच्या उद्देशाची स्तुति करून असें ह्मटलें, कीं शाळेंत दररोज मुलांस खिस्ती धर्मपुस्तक शिकविलें असतां, त्यापासून आमच्या लोकांचें कांहीं एक वाईट न्हातां उलटें कल्याण होईल असें मला वाटतें. याशिवाय, त्याणें शक्त्यनुसार सर्व प्रकारें त्या पाद्री गृहस्थास मदत केली, आणि ब्राह्म सभा पहिल्यानें ज्या वाड्यांत भरत असे तो वाडा, ती सभा दुसऱ्या ठिकाणीं गेल्यामुळें, रिकामा पडला होता, तो त्याच्या संकल्पित शाळेकरितां त्यास दिला. तो गृहस्थ पुढें सर्वकाळ बहुमानपूर्वक राममोहन रायाचे उपकार स्मरत असे.

युरोप खंडास जाऊन तेथील लोकांच्या रीतिभाति, विद्या, धर्म व राज्यनीति, आणि, विशेषंकरून, ज्या देशाच्या हातीं ईश्वरें आपल्या देशाच्या नशिबाची दो-

री देऊन ठेविली आहे; जो विद्या, कलाकौशल्यें, व स्वतंत्रता, यांचें भांडार; जो लॉक, बेकन, न्यूटन, हाम्पडन, वॉट्सन, इत्यादि महापुरुषांची जन्मभूमि; तो देश प्रत्यक्ष जाऊन पहाण्याची इच्छा राममोहन रायास फार दिवसांपासून झाली होती. परंतु ज्या सुधारणुकीच्या कार्यामध्यें तो गुंतला होता, त्यामुळें आपली इच्छा परिपूर्ण करणें कांहीं काळपर्यंत तहकूब ठेवणें त्यास भाग पडलें. परंतु आपल्या मतांचा प्रसार आतां बराच झाला, व मंडळीहि बरीच वाढली, आणि कंपनीस नवी सनद द्यावयाची तिजविषयीं पार्लमेन्ट सभेंत विचार होण्याचा समय जवळ येऊन पोंचला असें पाहून, तो जाण्याची तयारी करूं लागला. इतक्यांत त्यास अनुकूल अशी एक दुसरी गोष्ट घडून आली. आजपर्यंत कंपनि दिल्लीपति बादशाहास सर्व हिंदुस्थानचा चक्रवर्ती किंवा सार्वभौम कबूल करून आपणास त्याचे अंकित ह्मणवून राज्यकारभार करीत असे; परंतु आतां १८२६ सांत तिणें बादशाहास हा पोकळ मान देण्याचें बंद केलें, आणि नाण्यावर वगैरे आपलें नाव घालून, आपणास सर्व देशाचे स्वामी ह्मणवूं लागली. यावरून, आणि आपल्या राजधानीच्या आसपासच्या कांहीं मुलखाचा वसूल आ-

पणास असावा ह्मणून, बादशाहानें कोर्ट आव् डरेक्टर्स यांस अर्ज केला होता; त्याचा त्यांणीं व पुढें बोर्ड आव् कंट्रोल यांणीं विचार करून असें ठरविलें, कीं बादशाहास कराराप्रमाणें किंवा न्यायाच्या रीतीनें जेवढें पोंचायाचें तेवढें पोंचत आहे. त्यावरून बादशाहानें इंग्लंडाच्या राजाकडे अपील करण्याचा निश्चय करून राममोहन रायास आपला वकील नेमिला, आणि आपल्या वतीनें सर्व बोलणें चालणें करण्याचा पूर्ण अधिकार त्यास देऊन त्याच्या नावास "राजा" हें पद जोडिलें.

राममोहन राय युरोपास जाणार असें समजतांज, हिंदु लोकांत बहुत गवगवा झाला. राममोहन राय म्लेंच्छांच्या व गोमांसभक्षकांच्या देशीं जाणार ह्मणजे काय! त्याची परोपकारबुद्धि आणि जिज्ञासा नजाणतां, हें पर्यटन करण्यांत त्याचा कांहीं अयोग्य उद्देश आहे, अशा भलभलत्याच कल्पना ते करूं लागले. परंतु जो पुरुष त्यांच्या छलनांस बधला नाहीं, ज्याणें हजारो विघ्नांचें आणि अडचणींचें निमूटपणें निवारण केलें, धर्मसभेशीं युद्ध करून जय मिळविला, आणि ब्राह्मणांची निंदा आणि शाप यांस डचकला नाहीं, तो अशा कुरकुरणींस ऐकणार काय! सन् १८३० सांत नवेंबर महिन्याच्या पंधराव्या तारिखेस राममो-

हन राय, आपला पुत्र राजाराम राय, आणि दोन सेवक, रामरत्न मुकरजी व रामहरि मुकरजी, यांसहवर्तमान स्वदेश सोडून, आल्बिअन तारुं लिवरपुलास जावयाचें होतें त्यांत बसून चालता झाला. त्याबरोबरच्या एका उतारूनें त्याच्या जलपर्यटनाचें वृत्त लिहिलें आहे तें येणेंप्रमाणें :—

" तारवावर राममोहन राय आपल्याच खोलींत जेवीत असे, आणि निराळी चूल नसल्यामुळें प्रथम त्यास फार अडचण सोसावी लागली. त्याचे सेवक आजारी पडून त्याच्या खोलींत जाऊन पडले ते तेथून ढळतचना; परंतु राममोहन रायाचा स्वभाव इतका दयाळु होता, कीं त्यांस बाहेर काढायास सांगण्याबद्दल, तो आपणच उठून दुसऱ्या ठिकाणीं गेला. बहुतकरून तो संस्कृत आणि हिब्रु वाचीत असे. दोन प्रहरीं आणि संध्याकाळीं तो बाहेर येऊन संभाषण करीत बसे. त्याची वृत्ति सर्वकाळ संतोषित असे; आणि त्यावर सर्व मनुष्यांची मर्जी इतकी बसून गेली होती, कीं खलाशीहि आपल्या हातून घडेल तेवढी त्याची सेवा करण्यास तत्पर असत ."

सन् १८३१ सांत एप्रिल महिन्याच्या आठव्या तारिखेस आल्बिअन लिवरपूलच्या बंदरांत जाऊन नागरलें. राममोहन राय त्याच दिवशीं तडीस उतरून एका खाणावळींत गेला.

तो इंग्लंडांत गेला त्यासमयीं राज्यप्रकरणी सुधारणा करण्याविषयीं पार्लमेन्ट सभेंत विचार चालला होता त्याकडे सर्व लोकांचें लक्ष लागलें होतें. राममोहन राय याणें- हि सुधारणुकीचाच पक्ष उचलिला; कारण त्यास असें वाटलें, कीं ही सुधारणा इंग्लंड देशाच्याच कल्याणाकरितां आहे असें नाहीं, तर तिणेंकरून अंतीं आपल्या हिंदुस्थानाचेंहि बहुत कल्याण होईल.

हा तत्वज्ञानी हिंदु लिवरपूल येथें आल्याचें वर्तमान समजतांच, त्या शहरांतील बहुतेक प्रतिष्ठित गृहस्थ त्याच्या भेटीस आले. राममोहन रायाचा मित्र विल्यम रॉस्को ह्मणून लिवरपूल येथें एक प्रख्यात गृहस्थ होता त्याचे तीन पुत्र प्रथमतः त्यास भेटायास आले. ते स्वतःच भेटायास आले असें नाहीं, तर आपल्या विख्यात पित्याचे प्रीतिपूर्वक सलाम त्यास सांगायास आले. रॉस्को आजारी पडल्यामुळें कित्येक वर्षें त्याच्यानें बिच्छाना सोडवत नव्हता. राममोहन राय लिवरपूल येथें गेला तेव्हां तो अगदीं मरणोन्मुख झालेला होता, आणि त्यास कोणा एकास भेटूं देत नसत. असें असतांहि, त्याणें राममोहन रायास भेटण्याची परमानगी घेतली. त्या दोघांची भेट फार आनंदकारक आणि गहिंवर आणणारी होती; आनंदकारक अशासाठीं, कीं जी सुधारणा ते दोघेहि फार दिवसांपासून इच्छीत होते, परंतु जी लौकर हो-

ण्याचा संभव नव्हता, ती होण्याचा समय आतां जवळ येऊन ठेपला; आणि गहिवर आणणारी अशासाठीं, कीं त्यांतून एकाच्या मरणानें हें त्यांचें परम प्रीतीचें संभाषण आणि मित्रत्व, यांचा लौकरच अंत होणार. ही त्या मित्रांची या लोकीं सरशेवटली भेट. राममोहन रायानें लंडनांत असतां रॉस्कोच्या मरणाचें वर्तमान ऐकिलें.

या उभयतांची भेट झाली त्या समयीं जरी रॉस्कोच्या एका पुत्राखेरीज दुसरा कोणी जवळ नव्हता, तरी त्या घराचा खालचा मजला लिवरपुलांतल्या मधल्या प्रतीच्या लोकांनीं भरून गेला होता. जो तो या परदेश्याचीं राज्यसंबंधी आणि धर्मसंबंधी मतें, व इंग्लंडास जाण्याचा हेतु, यांविषयीं चौकशी करी. राममोहन राय खालीं आला तेव्हां ते सर्व त्याच्या तोंडाकडेस टेळून पहात राहिले. त्याणें त्या सर्वांस सत्कारपूर्वक सलाम केले, आणि त्यांतून कित्येक गृहस्थांशीं कांहीं वेळ तो भाषण करीत राहिला. इंग्लंड देशामध्यें राज्यसंबंधी व धर्मसंबंधी स्वतंत्रतेविषयीं भाषण करण्याचा हिंदूचा हाच पहिला प्रसंग; यापूर्वीं युरोपिअन भूमीवर कोणीं हिंदूनें पाऊलच ठेवलें नव्हतें; मग भाषण तर कोठून करणार!

लिवरपूल येथें असतां, डाक्तर ग्रेंडि याच्या युनिटेरिअन* देवळांत एक वेळ राममोहन राय गेला होता. तेथें ईश्वरस्तवन आणि उपदेश चाललीं होतीं तीं ऐकून तो

* केवळ एका देवासच भजणाऱ्या लोकांचें

फार संतुष्ट झाला. देऊळ सुटतांच सर्व लोकांनीं आपापल्या घरीं जावें तसें नकरितां या हिंदु महापंडितास पहाण्याकरितां दारांत एकच गर्दी करून टाकिली; आणि राममोहन रायानें त्यांशीं हात हालवून कांहीं भाषण केलें, तेव्हांच त्यांणीं त्यास संतोषानें जाऊं दिलें.

लिवरपूल येथें डाक्तर स्पर्झहेम, याशीं राममोहन रायाचा परिचय झाला. ते दोघे अत्यंत मित्र झाले असतांहि, राममोहन राय त्याच्या विद्येस ( फ्रेनॉलजीस * ) हसायास सोडीत नसे. तो असें करी तेव्हां तो डाक्तर इतकेंच ह्मणे, कीं या शास्त्राचीं मूलतत्वें जर तुह्मास समजलीं, तर त्याविषयीं तुमचें मत लागलेंच पालटेल. लिवरपूल येथें एका गृहस्थानें राममोहन रायाची भेट घेतली तिचें वर्णन, ज्याणें ती आपल्या डोळयांनीं पाहिली, अशा एका त्याच्या मित्रानें केलें आहे, तें येणेंप्रमाणें :—

" राममोहन राय लिवरपूल येथें असतां, एक गृहस्थ त्यास भेटायास आला, त्याणें त्याचें फार मनोरंजन केलें; तो पूर्वीं हिंदुस्थानांत दिवाणी कामदार होता, आणि त्यास थट्टामस्करी करणें फार आवडत असे. तो या हिंदूस पहातांच हिंदुस्थानींत बोलूं लागला. ' अच्छा, तुम बंगाली, हम बंगाली; तुम बंगाली; वेल, कैसा है, साहेब? नंतर मुलाकडे वळून ह्मणतो, ' आ, छोकरा, वेल,

* फ्रेनॉलजि ह्मणजे कोणत्याहि मनुष्याच्या मस्तकाच्या आकृतीवरून आणि रचनेवरून त्याच्या मनाचे गुणधर्म आणि शक्ति यांचें अनुमान करण्याची विद्या.

कितने बरस ?, कैसा मुलूख, अच्छा है, ? या सर्व प्रश्नांस राममोहन रायानें यथायोग्य उत्तरें दिलीं".

असें दिसतें कीं लिवरपूल येथें राजाचा जो मेअर ह्मणजे कोतवाल असतो, त्याकडून हा गृहस्थ राममोहन रायास बोलवायास आला होता. आपला हुद्दा मोठा याजकरितां कोणा गृहस्थास भेटायास स्वतः जाणें आपणास योग्य नाहीं असें त्यास वाटून, तो कोतवाल स्वतः आला नाहीं, आणि त्याणें या आपणापेक्षां कमी पदवीच्या व हिंदुस्थानांतील माहितगार मनुष्यास पाठवून, राममोहन रायास आपल्या वाड्यांत येऊन भेट देण्याविषयीं विनंति केली. परंतु राममोहन राय त्याच्या विनंतीस मान्य झाला नाहीं; त्याणें त्या बोलवायास आलेल्या गृहस्थाचा चांगला मान राखून त्याचें मन नदुखवितां त्यास परत पाठविलें. ज्यास आपणाकडे येणें हलकें असें वाटलें, त्याच्या घरीं आपणास जाण्याचें तरी काय प्रयोजन आहे, असें कदाचित् त्याच्या मनांत आलें असेल तर कोण जाणे.

राममोहन राय लिवरपूल येथें फार दिवस राहिला नाहीं. तो लंडनास जात असतां, देशाच्या संपत्तीचीं आणि सुधारणुकीचीं जीं चहूंकडेस चिन्हें दिसत तीं पाहून फार आनंद पावला. तेथील लहान लहान गांव, बाग, वाड्या, आणि आगीच्या गाड्यांचे रस्ते, पूल, नळ, इत्यादिकेंकरून त्याच्या नेत्रांचें समाधान झालें, आणि तो असें

ह्मणाला, कीं इंग्लंड देशास आजकाळीं पृथ्वीवरील राष्ट्रांम-ध्यें इतकें महत्व देण्यास कारणभूत जीं त्याचें ज्ञान, उद्योग आणि धैर्य, त्यांचे हे सर्व प्रताप होत, आणि त्यांची न्यूनता असल्यामुळेंच माझा देश दरिद्राचें आणि दुःखाचें विवर झाला आहे. तो मानूचेस्टर शहरीं कारखाने पहावयास राहिला. तेथील यंत्रें पाहून तो अति आनंद पावला. सर्व कामकरी हातांतलीं कामें टाकून त्यास पहावयास धांवले; त्यांतून कित्येकांशीं हात हालवून राममोहन रायानें थोडेंसें संभाषण केल्यावर, ते आपापल्या कामांवर परत गेले.

तो रात्रौ लंडनांत पोंचला, आणि शहराच्या घाणेरड्या भागीं एका घाणेरड्या घरांत जाऊन उतरला. रात्रभर तेथेंच रहाण्याचा त्याचा बेत होता, परंतु तेथील दुर्गंधी त्यास सहन होईना, यामुळें एक गाडी आणवून, आडेल्फी नावाची एक खाणावळ होती, तेथें तो दाहा वाजतां जाऊन पोंचला. मध्यरात्रीच्या सुमारास तो निजायास गेल्यानंतर, बेन्थम या प्रख्यात युटिलिटेरिअन* तत्वज्ञान्यानें त्या खाणावळींत येऊन राममोहन रायास आपल्या नावानें एक चिट्ठी लिहून ठेविली. त्या तत्वज्ञानें आपल्या भेटीस येण्यांत आपणास किती मान दिला, हें राममोहन रायानें पुर्तें जाणिलें. आपल्या आयुष्याचा अवघा काळ मानवी जातीच्या कल्याणाकडेस लागावा ह्मणून ज्या बेन्थमानें प्रपंचसुखाचा केवळ परित्याग केला होता, आणि कोणा-

---

* कोणत्याहि मतांच्या किंवा वस्तूंच्या उपयोगीपणाकडेस विशेष लक्ष देणारा.

कडे नाचतमासा पहाण्यास किंवा जेवणाखाणासहि जाव-
याचें नाहीं असा नियम धरिला होता, तो आपलें वैराग्य
टाकून मुद्दाम राममोहन रायाची भेट घेण्यास आला, याव-
रून या सुप्रकाशित आणि असाधारण हिंदूविषयीं त्याच्या
मनांत किती मान असे हें सहज दिसून येतें. नंतर
त्या उभयतांची भेट झाली तेव्हां, मनुष्याच्या सुखाचीं जीं
मुख्य दोन धोरणें, राज्यव्यवस्था आणि नीतिधर्म, त्यांविष-
यीं, हिंदु लोकांच्या स्थितीविषयीं,आणि हिंदुस्थान ( कंपनी)
च्या राज्यपत्धतीविषयीं, या दोघां महापुरुषांचें कांहीं संभा-
षण झालें. तो तत्वज्ञानी ह्मणाला " राममोहन राय ते-
तीस कोटि देवांची पूजा टाकून, अत्युत्तम असा जो धर्म-
विषय, त्यांत विचाराचा अवलंब करायास आह्माजवळ
शिकला आहे." तो त्यास इतका मानवूं लागला, कीं
मनुष्यजातीचें कल्याण करण्यांत तो आपला अति प्रियक-
र आणि उपयुक्त भागीदार आहे असें तो ह्मणत असे.

राममोहन राय लंडनांत येऊन पोंचल्याचें वर्तमान स-
मजतांच, राष्ट्रांतील पहिल्या प्रतीचे आणि मोठमोठे नामांकि-
त असे पुष्कळ मनुष्य त्यास भेटायास आले. तो सकाळीं
अकरा वाजतां बिऱ्हाडीं जाऊन उतरला तेव्हांपासून तों सं-
ध्याकाळचे चार वाजतपर्यंत, त्याच्या दारांत गाड्यांची एक-
च गर्दी होऊन गेली होती. त्याची प्रियवृत्ति, गोड भाषण,
आणि इंग्लंडाचा धर्म, राज्यरीति, व लोकांच्या चालचर्या,

इत्यादिकांविषयीं त्यास इतकी माहिती पाहून सर्वांस मोठें आश्चिर्य वाटलें.

तो ज्या राज्यसंबंधीअधिकारानें (बादशाही वकिलाच्या नात्यानें ) इंग्लंडास गेला होता तो राजाच्या प्रधानांनीं मान्य केला, यावरून राममोहन रायाविषयीं त्यांच्या मनांत किती मान असे हें सहज दिसून येतें. लंडन शहरीं पहिल्या प्रतीच्या लोकांत राममोहन रायाची गणना झाली. हिंदुस्थानांत काम करून गेलेले जड्ज ( न्यायाधीश ), कौन्सिलर ( मंत्री ) आणि गवर्नर हेहि त्याच्या मित्रत्वाची इच्छा करूं लागले. ज्या संस्थान्यांस आणि सरदारांस हिंदुस्थानांत असतां त्याचा समाचार घेणेंहि हलकेंसें वाटलें असतें, आणि ज्यांणीं जोडा काढिल्यावांचून त्यास आपल्या कचेरींत येऊंहि दिलें नसतें, ते सर्व आतां राममोहन रायाशीं आपली पूर्वींची कोठची ओळख असेल तर ती जोडून देण्यास उत्सुक झाले. बहुतेक अर्ल, मार्किस आणि ड्यूक* हे केवळ आपलें वैभव दाखवून त्याचा बाह्यत्कारें मान राखण्यास इच्छीत असत असें कदाचित् असलें, तथापि त्याची खरी योग्यता जाणून, त्यापासून हिंदुस्थानाविषयीं माहिती काढून घेण्यास इच्छिणारे असे पुष्कळ गृहस्थ होते. लॉर्ड ब्रूहम, सर वॉल्टर हार्टन, सर हेन्रि स्ट्राचि आणि चार्लस हॉब्स, हे त्यांमध्यें मुख्य होते. लॉर्ड ब्रूहम आणि राममोहन राय हे दोघे अत्यंत विश्वासु

* ह्या मानकऱ्यांच्या अगदीं वरल्या प्रति आहेत.

आणि जिवलग मित्र झाले होते.

राममोहन रायाचा, राष्ट्रांतील मोठमोठ्या आणि पहिल्या प्रतीच्या लोकांनींच बहुत मान राखिला असें नाहीं, तर स्वतः राजानेंहि त्याचें चांगलें आगतस्वागत केलें. सर जी. सी. हॉब्हौस त्यासमयीं बोर्ड आव् कंट्रोल सभेचा अध्यक्ष होता त्याणें त्यास राजाच्या दरबारीं नेलें; तेव्हां महाराजांनीं परदेशी वकिलांमध्यें त्यास जागा घेतली. लंडनांतील पूल बांधून तयार झाला त्याच्या उत्साहार्थ जो मोठा सरकारी भोजनसमारंभ झाला, त्याचें महाराजांकडून राममोहन रायास आमंत्रण आलें होतें. कोर्ट आव् डरेक्टर्स यांणीं जरी त्याची वकिली मान्य केली नाहीं तरी कंपनीच्या नावानें त्यास एक मेजवानी केली.

आपल्या मूलसंकेताप्रमाणें, राममोहन राय सर्व प्रकारच्या सभांस जातअसे. पार्लमेन्ट सभेंत जाऊन, राज्यप्रकरणीं सुधारणुकीचे कैवारी तेथें शांतपणें जें भाषण करीत तें तो ऐकत बसे; आणि तसेंच देवळांत जाऊन धर्मोपदेश हि श्रवण करी

फीमेल सोसाएटि ह्मणून स्त्रियांची एक मंडळी होती तींतील स्त्रियांची वर्तणूक पाहून राममोहन राय फार संतोष पावला. तसेंच त्याची प्रियवृत्ति, श्रेष्ठाचार आणि गोड व बहुमानपूर्वक भाषण, यांवरून त्या स्त्रियाहि त्यास मानवूं लागल्या.

जेथें दुरभिमानानें स्त्रिया अज्ञानरूप विवरामध्यें कोंडून ठेविल्या आहेत, अशा भूमीच्याठायीं जरी त्याणें जन्म घेतला, तरी स्त्रियांच्या संगतीनें पुरुषांचीं मनें किती कोमळ होतात हें त्यास पुरें समजलें होतें; यास्तव, तो युरोपिअन स्त्रियांची फार स्तुति करी, यांत कांहीं आश्चर्य मानायाजोगें नाहीं. त्याणें असें ह्मटलें आहे, कीं " माझें पर्यटन आणि या देशांतील ( इंग्लंडांतील ) ज्ञान, वैभव, लोकांच्या रीतिभाति, आणि, त्यांत विशेषेंकरून, येथील स्त्रियांचे गुण आणि वर्तणूक, यांविषयीं जें कांहीं लक्षांत धरण्याजोगें मला आढळलें आहे, त्या अवघ्याचें वृत्त, मी लौकरच एक पुस्तक छापणार आहें त्यांत, सांपडेल. याप्रमाणेंच, खरे भक्तिमान् आणि सद्गुणी अशा धर्मोपदेशकांची संगत राममोहन रायास फार आवडत असे. तो असें ह्मणतो, कीं आपणास सहकुटुंब युरोप खंडांत रहावयाचें असतें, तर आपण आपल्या कुटुंबांतील माणसांचा, धर्मोपदेशकांखेरीज दुसऱ्या कोणाशीं, परिचय करून दिला नसता, आणि त्या धर्मोपदेशकांतूनहि आपल्या मित्रांचीच निवडणूक केली असती; ते इतके सुशील असतात, कीं त्यांमध्यें असतां आपण आपल्या आप्तांतच आहों असें आपणास भासतें.

हिंदुस्थानाच्या राज्यकारभाराची नवी सनद कंपनीस देण्याविषयींचा विचार पार्लमेन्ट सभेमध्यें लौकरच सुरू झाला. ज्यांणीं पूर्वी दिवाणी किंवा लश्करी खात्यांत कंपनीची चाकरी केली होती, अशा पुष्कळ गृहस्थांच्या साक्षी घेतल्या. राममोहन रायाचीहि, हौस आव् कॉमन्स यांच्या सिलेक्ट कमिटी ( निवड मंडळी ) पुढें, साक्ष घेतली.

राममोहन रायाची विद्वत्ता, अनुभव, आणि स्वदेशप्रीति, यांवरून स्वदेशाच्या राज्यव्यवस्थेबाबद साक्ष देण्यास तो योग्य होता, याविषयीं तर संशय बाळगायासच नको. त्याच्या साक्षीचा एक निराळाच ग्रंथ बांधून छापिला आहे; त्याचें नाव "हिंदुस्थानचें न्यायखातें आणि वसूलखातें, व लोकांची स्थिति, यांचें विवेचन". कमिटीच्या प्रश्नांस त्याणें जीं उत्तरें दिलीं आहेत त्यांवरून, त्यास स्वदेशीय लोकांच्या दुःखांची चांगली माहिती होती, असें दिसून येतें. त्यांत हिंदुस्थान ( कंपनि ) सरकारची केवळ व्यर्थ निंदा केलेली आहे असें नाहीं, परंतु आपल्या देशबांधवांची स्थिति सुधारण्याविषयीं त्याची मनःपूर्वक उत्कंठा चहूंकडेस दृष्टीस पडती, आणि अगदीं चोपून गेलेली अशी हिंदुस्थानची जी कोट्यावधि रयत तिजविषयीं, विशेषेंकरून, फारच कळवळा प्रगट केलेला आहे.

राज्यप्रकरणांत राममोहन राय हा सुधारणारा परंतु मो-

ठा शांत आणि विचारी सुधारणारा होता. प्रथमतः तो इंग्रेजी राज्याच्या विरुद्ध असे; परंतु पुढें त्याविषयीं त्यास अधिक ज्ञान होऊन पूर्वींच्या मुसलमानीशीं त्याणें त्याची तुलना करून पाहिली, तेव्हां त्याविषयीं पूर्वीं त्याचें जें मत होतें तें पालटलें, आणि उलटी तो त्याची प्रशंसा करूं लागला. या देशाचें आधिपत्य इंग्लिशांकडेस गेलें ही ईश्वरी कृपेनें येथील लोकांच्या कल्याणाची एक मोठी गोष्ट झाली, आणि सध्या ते लोक या देशांतून गेले असतां, तेणेंकरून हिंदूंचें हित होण्याबद्दल अनहितकार होईल, असें तो ह्मणत असे.

राममोहन राय हा धर्म प्रकरणी आणि राज्यप्रकरणी मोकळिकीच्या पक्षानें लढणारा मोठा शूर आणि उत्कंठित सरदार होता. युरोप खंडांत तिचा इतका जय झालेला पाहून त्यास अत्यंत आनंद होत असे, आणि त्याप्रमाणेंच आपल्या जन्मभूमीच्याठायीं तिणें वृद्धिंगत आणि बलवत्तर होऊन सर्वांस आपले अनुसारी करावें ह्मणून त्याणें आपली पराकाष्ठा केली; परंतु त्याच्या इच्छेप्रमाणें कांहींच घडून आलें नाहीं असें ह्मटल्यास चिंता नाहीं. मोकळिकीविषयीं त्याची जी उत्कंठा तिच्या प्रगटीकरणाचीं एक दोन उदाहरणें येथें आह्मी लिहितों, ह्मणजे त्यांवरून ती बरीच चांगली सर्वांच्या ध्यनांत येईल. यापूर्वीं कां-

हीं दिवस स्पेन देशामध्यें राज्यप्रकरणीं फार अव्यवस्था होऊन तंटेबखेडे चालले होते; त्यामुळें सर्व देशभर कायदे, नियम, व मोकळीक यांचा कांहींच हिशेब न रहातां, झोटिंग पाच्छाई चालली असे. परंतु सुमारें याचसमयीं त्या सर्व बेबंदीचें निवारण होऊन, पुनः व्यवस्थेची स्थापना झाली. तेव्हां तिच्या उत्साहार्थ, राममोहन राय आणि त्याचा मित्र बाबु द्वारकानाथ ठाकूर, यांणीं आपल्या युरोपिअन स्नेह्यांस एक मोठी मेजवानी केली. तसेंच, राममोहन रायाच्या वेळीं "कलकत्ता जर्नल" ह्मणून एक उत्कृष्ट वर्तमानपत्र कलकत्त्यांत निघत असे. त्याचा कर्ता मिस्तर बकिंघम ह्मणून एक विद्वान् आणि हिंमतदार गृहस्थ होता, तो हिंदुस्थानाचें कल्याण चिंतिणारा असून राममोहन रायाचा मोठा मित्र असे. परंतु त्या वेळीं आतांप्रमाणें कोणताहि आणि कोणाच्याहि विरुद्ध मजकूर लिहिण्याची मोकळीक हिंदुस्थानांत नव्हती, त्यामुळें कलकत्त्याच्या गवर्नरानें कांहीं आरोपावरून तें पत्र बंद करण्यास आणि त्याच्या कर्त्यास देशपार करण्यास हुकूम केला. तेव्हां राममोहन रायानें स्वतः पुढें होऊन, हिंदुस्थानांत छापण्याची मोकळीक असावी ह्मणून, इंग्लंडाच्या राजास अर्ज केला.

व्हिग आणि कॉन्सर्वेटिव* ह्मणून इंग्लंडांत जे दोन

*कॉन्सर्वेटिव किंवा ज्यांस टोरि असेंहि ह्मणतात, ते लोक बहुधा राजाचा आणि जुन्या चालींचा पक्ष धरून भांडत असत; आणि व्हिग हे बहुधा लोकांच्या हक्कांचा, मोकळिकींचा, आणि राज्यपद्धतींत वारंवार सुधारणा करण्याचा कैवार घेत असत.

राज्यप्रकरणीं पक्ष असून त्या दोहोंतीलहि प्रमुखांत राम-
मोहन रायाची मोठी वग असे, आणि ही वग त्याणें आ-
पला स्वार्थ साधण्यांत खर्चिली नाहीं, तर आपल्या दे-
शाचें कल्याण करण्यांत त्या अवघीचा व्यय केला,
येणेंकरून त्याच्या नावाचें तेज विशेष पडतें. नाहीं तर,
आपल्या लोकांचें ह्मटलें ह्मणजे बहुधा वजन, प्रतिष्ठा, वि-
द्या, यांचा उपयोग काय तो आपणास किंवा आपल्या आ-
प्तविषयांस मोठ्या जागांवर चढवून, आपल्या हलक्या
वांच्छा तृप्त करणें हा असतो. परंतु राममोहनराय
हा आपल्या बहुतेक स्वदेशीय जनांपासून केवळ भि-
न्न होता. त्याणें जें कांहीं केलें त्या अवघ्याचा उद्देश,
ज्या भूमातेच्या उदरीं आपण जन्म घेतला तिच्या बाळकां-
चें ह्मणजे आपल्या बांधवांचें कल्याण करावें, हा असे;
आणि यावरूनच एका ग्रंथकारानें असें ह्मटलें आहे, कीं
"कांटेऱ्या झाडांमध्यें जसा एकादा चांफा असतो, तसा रा-
जा राममोहन राय आपल्या स्वदेशीय लोकांत होऊन गे-
ला." असो, परंतु राममोहन रायाचें इंग्लंड देशीं जें वजन
होतें त्याविषयीं एक गोष्ट आह्मास कळली आहे ती आ-
ह्मी येथें लिहितों, ह्मणजे तिजवरून तें चांगल्या रीतीनें स-
र्वांच्या ध्यानांत येईल. हौस आव् लॉर्ड्स या मानक-
ऱ्यांच्या सभेमध्यें हिंदुस्थानाच्या राज्यव्यवस्थेविषयीं एक

खर्डा तयार होत होता, त्यास कॉन्सर्वेटिव पक्षाचे लोक प्रतिबंध करीत होते, ते राममोहन रायाचें पत्र जातांच उगेच राहिले.

सन् १८३२ सांत हिंवाळ्याच्या दिवसांत राममोहन राय फ्रान्स देशास गेला, तेथेंहि इंग्लंडांतल्याप्रमाणेंच त्याचें आगतस्वागत झालें. राजानें त्यास बहुत मान देऊन दोन वेळा आपल्याबरोबर जेवावयास बोलाविलें. तेथील दरबारी लोक आणि तसेच विद्वान् मनुष्यहि या परदेशी गृहस्थाविषयीं आपला बहुमान प्रदर्शित करण्यास मोठे उत्सुक असत.

सन् १८३३ या सालाच्या आरंभींच तो इंग्लंडास परत आला; परंतु त्याची प्रकृति बिघडली होती. परंतु तो तसाच ब्रिस्टल येथें गेला, आणि तेथून डेवनशैर येथें जाण्याचा त्याचा इरादा होता. पुढें नऊ दिवसांनीं त्यास ताप आला. डाक्तर प्रिचर्ड आणि डाक्तर कारिक हे दोघे वैद्य त्यास औषध देत असत. औषधानें थोडा काळपर्यंत त्यास गुण आला; परंतु लौकरच पुनः पहिल्याच्या दुप्पट ताप येऊं लागला, आणि त्यानंतर तो बेशुद्ध झाला तो पुनः कधींच शुद्धीवर आला नाहीं, व बोललाहि नाहीं. शेवटीं सप्तेंबर महिन्याच्या सत्ताविसाव्या तारिखेस पहांटेचे दोन वाजतां त्यास देवाज्ञा झाली. आपण या दुखण्यां-

तून निभावत नाहीं हें त्यास समजलें होतें. तो अत्यावस्थ असतां फारसें बोलला नाहीं, परंतु मनांत ईश्वराचें स्मरण करीत होता असें जवळच्यांच्या ध्यानांत आलें.

युरोपास निघून जाण्याच्या पूर्वीं, राममोहन रायानें आपल्या मित्रांस असें सांगून ठेविलें होतें, कीं मी मरण पावल्यावर ख्रिस्ती, हिंदु, मुसलमान, हे सर्व मला आपापल्या धर्माचा ह्मणूं लागतील, परंतु मी त्यांतून कोणत्याहि धर्माचा नाहीं. त्याचें हें भविष्य अगदीं शब्दशः खरें झालें. तो मेला हें समजतांच, त्याच्या धर्माविषयीं मोठा वाद पडला. कित्येक तो हिंदु धर्म मानी असें ह्मणत; कित्येक तो ख्रिस्ती होता असें ह्मणत. इंग्लंडचे धर्माधिकारी ह्मणत कीं तो आपल्या पंथाचा होता; पुनः, युनिटेरिअन तो आपल्या मताचा होता ह्मणून भांडत. वेदान्ती ह्मणत कीं तो तर अक्षरशः वेदान्त मानणारा होता, आणि मुसलमान तो महंमदाचा अनुसारी होता ह्मणून भांडत असत. या सर्व पक्षांस राममोहन रायास आपणाकडेस ओढून घेण्यास बरींच सबळ कारणें होतीं हें खरें आहे. इंग्लंडांत असतां तो वारंवार युनिटेरिअन देवळांत जाई, आणि आपणास त्या मतांची आवड आहे असें दाखवी, हें युनिटेरिअन लोकांस तो आपल्यांतला होता असें ह्मणायास एक सबळ कारण होतें. परंतु विशेषेंकरून वेदान्तालाच उत्तेजन देणें त्यास योग्य

वाटलें, आणि तें त्याणें दिलें, यावरून पहातांतर तो वेदांती हें अगदीं सिद्ध झाल्यासारिखें दिसतें; पुनः, तो महंमदी धर्माची स्तुति वारंवार करी, यावरून तो कुराण मानी असेंहि ह्मणायास कांहींसें कारण दिसतें. परंतु राममोहन राय धर्मानें मुसलमान नव्हता याविषयीं तिळभरहि संशय बाळगण्याची गरज नाहीं. तो युनिटेरिअनहि नव्हता. आणि राममोहन रायानें वेदान्तावर इतके ग्रंथ लिहिले, आणि त्यास बहुत प्रकारें आश्रय दिला, यावरून तो वेदान्ती अशी जरी पुष्कळांची समजूत पडून गेली आहे, तरी तो शुद्ध वेदान्ती होता असेंहि आपल्याच्यानें ह्मणवत नाहीं; आणि यद्यपि तो वेदान्ती असला तथापि त्याचा वेदान्त आमच्या जुन्या लोकांच्या वेदान्तापासून ( किमानपक्षीं व्यवहारिक वेदान्तापासून तरी ) केवळ भिन्न आणि सुधारलेला होता असें ह्मणायास कांहीं चिंता नाहीं. तर मग राममोहन राय धर्मानें होता तरी कोण ? हा प्रश्न कोणाच्याहि मनांत सहज उत्पन्न होईल, आणि या हिंदु तत्वज्ञान्याचा वृत्तांत ह्मटला ह्मणजे त्याचीं धर्ममतें हीं त्याचा मुख्य भाग होत, याजकरितां त्यांविषयीं आह्मास एका ग्रंथाच्या आधारानें जें कांहीं समजलें आहे तें आह्मी येथें लिहितों, आणि त्यापुढें राममोहन रायाच्या मतांविषयीं अधिक विचार किंवा निर्णय करणें तें आमच्या वाचणारांकडेस ठेवितों.

अमुक एका धर्मांचीं कित्येक मतें त्यास आवडत किंवा तो त्याच्या देवळांत जाई, यावरून तो तो धर्म खरा मानी असें अनुमान करितां येत नाहीं; कारण राममोहन राय हा धर्मप्रकरणीं बेन्थमतानुसारी होता, ह्मणजे तो कोणत्या एकाद्या धर्माची योग्यता, त्याचा मानवी सुखाचें मान वाढविण्याचा आणि दुःखाचें मान कमी करण्याचा कल असेल तदनुसार करीत असे. याजकारितां अमुक धर्मास त्याणें आश्रय दिला ह्मणून यावरून तो तो धर्म मानी असें ह्मणवत नाहीं. त्याणें वेदान्तावर जे ग्रंथ लिहिले आहेत त्यांवरून ह्मणजे तो वेदान्त मानी असें कांहीं सिद्ध होत नाहीं, परंतु त्याच्या आधारानें एक नवेंच एकदैविक मत स्थापावें असा त्याचा मानस होता असें दिसतें. पुरातन काळच्या बहुतेक तत्वज्ञान्यांप्रमाणें, राममोहन रायाचा धर्म सृष्टिधर्म होता. परस्परांशीं अगदीं विरुद्ध अशा भिन्नभिन्न धर्मांच्या मतांस तो आश्रय देई आणि त्यांचा पक्ष धरी, यावरून त्याचें मत अस्थिर होतें असें जरी प्रथमतः कदाचित् कोणास वाटेल, तरी अंमळ विचार करून पाहिलें असतां, कोणत्या तरी अनुचित नव्हे अशा मार्गानें, धर्मप्रकरणीं किंवा परमार्थप्रकरणीं, मनुष्याचें कल्याण करण्याविषयींचें जें त्याचें मुख्य

आणि दृढ मत, त्याचें तें फळ होय असें आपणास समजून येईल; कारण तो सोळा वर्षाचा असतां त्याणें मूर्तिपूजेचा त्याग केला त्या दिवसापासून तों तो मरेपर्यंत, सुमारें पन्नास वर्षांत, त्याचीं धर्ममतें जीं कांहीं होतीं तीं तशींच होतीं, त्यांत सांगण्याजोगता किंबहुना मुळींच फेरफार झाला नाहीं असें वाटतें.

त्याचीं धर्ममतें फारसी भाषेंत एका लहानशा पुस्तकांत छापिलेलीं आहेत, व त्याची प्रस्तावना आरबींत लिहिलेली आहे. तो जिवंत असतांच जरी हें पुस्तक छापून तयार झालें व त्याच्या कित्येक मित्रांनीं पाहिलेंहि होतें, तरी तो मरेपर्यंत तें लोकांत प्रसिध्द झालें नाहीं; कारण स्वदेश सोडून युरोप खंडास निघून जातेसमयीं त्याणें आपल्या मित्रांस असें सुचवून ठेविलें होतें, कीं तें पुस्तक आपल्या मरणानंतर प्रसिद्ध करावें. या पुस्तकाचें नाव "तोहफत अल् मोवाहेदीन" ह्मणजे युनिटेरिअन मतानुयायी यांस नजराणा. हें पुस्तक ज्यांणीं वाचिलें आहे ते असें ह्मणतात कीं त्यावरून, ईश्वर एक आहे, त्याची शक्ति अपार व दया अपार, आणि आत्मा अमर आहे, हें राममोहन राय मानी, असें कळून येतें. त्यांत सर्वप्रकारच्या मूर्तिपूजेचा अगदीं निषेध व अतिशय उपहास केला आहे. देव एकच हें महंमदी धर्माचें मुख्य मत अस-

त्यामुळें जरी त्याची थोडीशी स्तुति केली आहे, तरी तसेंच मक्केचा अवतारी, आणि त्याचीं भविष्यकथनें व दुसरीं ढोंगें, यांचें यथायोग्य खंडन आणि तिरस्कार केला आहे.

वर जें लिहिलें आहे त्यावरून हें बहुतेकांच्या ध्यानांत आलेंच असेल, कीं सर्व पंथांतून निवडून चांगलीं व उपयुक्त अशीं मतें आढळतील तीं ग्रहण करणारे जे तत्ववेत्ते असतात, त्यांतला राममोहन हा एक होता. आमच्या मतें तर, तो ईश्वरज्ञानसंबंधी किंवा परमार्थज्ञानसंबंधी जनहितकर्ता होता. परमेश्वराविषयीं व इतर जनांविषयीं मनुष्याच्याठायीं प्रीति वाढविणें हें त्याचें मुख्य आणि व्यवहारिक धर्ममत होतें. सृष्टिधर्माविषयीं त्याचा भाव दृढ असे, आणि मनुष्यजातीस धर्माची आवश्यकता आहे असें त्यास वाटत असे. त्याचें नेहमी असें मत असे, व दिवसेंदिवस त्याविषयीं त्याची अधिकच खात्री होत गेली, कीं धर्मावांचून मनुष्याचें कल्याण व्हावयाचें नाहीं, व मानवी स्वभावास धर्म हा एक आवश्यक विषय आहे. त्याणें पुष्कळ इतिहास वाचिला होता, आणि त्यावरून असें खचित अनुमान काढिलें होतें, कीं ज्या लोकांस मुळीं ईश्वरच नाहीं ते कधींहि महत्वास चढावयाचे नाहींत. परमेश्वराविषयीं, आत्म्याच्या अमरपणाविषयीं, आणि नीतिसंबंधी जबाबदारीविषयीं विचार जर सर्व माणसांच्या

मनांतून नष्ट झाले, तर मानवी सुखाची इमारत लागली-च कोसळून तिचे तुकडे तुकडे होऊन जातील, अशी त्याची पक्की खात्री झाली होती. त्याणें पुर्तें जाणून ठेविलें होतें, कीं देवच नाहीं, आपल्या शारीर व मानसिक रचना, आणि अपरमित व विस्तीर्ण आकाश ज्यांहीं-करून भरून गेलेलें दिसतें ते सूर्य व ग्रह, हे सर्व केवळ सहज उत्पन्न झाले; त्या सूर्याच्या व ग्रहांच्याहि मागें रहावयाचें त्याबद्दल, आपण केवळ क्षणभंगुर प्राणी आहों व मेलों ह्मणजे गेलों आणि मरणानंतर आपणास कोणतीच गति नाहीं, आणि अंधारांत केलेल्या कर्मांस कोणी पहाता नाहीं, असें मनुष्यें क्षणभर समजतील, तर तीं लागलींच संशयीपणांत पडून, मुळच्या जंगली आणि अंधारमय अवस्थेमध्यें गर्क होऊन जातील.

परमेश्वर, जो अवघ्याचें आदिकारण, जो अनाद्यंत आणि ज्याचें ज्ञान अपार, त्याविषयींचा विचार हा सर्व विचारांहून अति उच्च आणि बहुसमावेशक असें तो मानीत असे; आणि हा विचार मनुष्याच्या मनांत बिंबवून देणें आणि प्रफुल्लित करणें हा सर्व विद्येचा मुख्य उद्देश असें त्याचें मत असे. दुसरें सर्व ज्ञान यापुढें शून्यवत् होय. मनुष्याच्या उच्चत्वाचें किंवा मोठेपणाचें तें मूळकारण आणि कसोटी होय. तें त्याच्या इहलोकींच्या आणि परलोकींच्या सुखाचा पाया होय. याजकरितां अज्ञानरूप अंधःकारांत

गडून गेलेले जे आपले स्वदेशीय जन त्यांमध्यें या ज्ञानाचा प्रसार करणें हें आपल्या जिण्याचें सार्थक असें त्यास वाटत असे.

मूर्तिपूजेंत ईश्वराचा अपमान व पाप घडतें असें जरी राममोहन राय मानीत असे, तरी तो संशयीपणाचा तिजहूनहि अधिक तिरस्कार करी. संशयीपणा ह्मणजे मानवी बुत्धीस मोठा कलंक होय असें तो मानी. एका विद्वानानें या प्रकरणीं राममोहन रायाविषयीं याप्रमाणें लिहिलें आहे:--

"राममोहन रायाचें वय जसजसें उतार होत चाललें तसतशी, मनुष्याच्या कल्याणार्थ धर्माच्या आवश्यकतेविषयीं, आणि संशयीपणाच्या भयंकर परिणामाविषयीं, त्याची अधिक खात्री होत चालली. प्रथमतः लहान असतां तो सगळ्याच गोष्टींवर विश्वास ठेवणें हें फार वाईट असें मानीत असे; आणि याविरुत्ध त्याणें आपले सर्व यत्न चालविले; परंतु नंतर त्यास असें वाटूं लागलें कीं अति थोडें मानणें हें तितकेंच किंबहुना त्याहून वाईट आहे. त्या वेळीं कलकत्त्यांत शिकलेल्या तरुण गृहस्थांनीं एक मंडळी उपस्थित केली होती, आणि ते आपणास सर्वस्वीं संशयी ( ह्मणजे नास्तिक ) ह्मणवीत असत. या लोकांविषयीं राममोहन रायास फार दुःख होत असे. त्या मंडळींत ईस्ट इंडिअन, आणि इंग्रेजी

विद्याभ्यासेंकरून आपल्या वाडवडिलांच्या धर्मावरून ज्यां-
ची श्रद्धा उडाली होती असे हिंदु, असत. हे लोक
पराकाष्ठेच्या दुरभिमानी लोकांपेक्षांहि वाईट, आणि त्यां-
चीं मतें नीतीचा समूळ उच्छेद करून टाकणारीं असें
राममोहन राय मानी."

हीं वाक्यें ज्याणें लिहिलीं तो राममोहन रायाच्या अत्यं-
त परिचयांतला होता, आणि यांवरून आपण सर्वांनीं चां-
गला उपदेश घ्यावा. वर सांगितलेली मंडळी पुढें वाढत
गेली. कलकत्त्यांत हिंदूंमध्यें दोन पक्ष झाले. एका
पक्षाचे लोक तेतीस कोटि देव आहेत असें मानीत, आ-
णि कालिका, दुर्गा, इत्यादिकांची उपासना करीत; दुसऱ्या-
चे मुळीं एकहि देव मानीतना, आणि कोणाचीच आरा-
धना करीत नसत. पहिले, या जगाची व्यवस्था कोट्या-
वधि देवांच्या सत्तेंत आहे, असें मानीत; दुसरे, ती कोणा
एकाच्या तरी सत्तेंत आहे, हेंच कबूल करीत नसत.

राममोहन रायास, जे शिकलेले तरुण आपणास
सर्वस्वीं नास्तिक ह्मणवीत, ते अति दुरभिमानी मनुष्यांपेक्षां-
हि वाईट, आणि त्यांचीं मतें नीतीचा समूळ उच्छेद क-
रून टाकणारीं असें वाटलें, यांत कांहीं आश्चिर्याची गो-
ष्ट आहे असें नाहीं. पुरातन काळचे महाविद्वान् आ-
णि तत्ववेत्ते, व्यास, मनु, सोक्रेटीस, प्लेटो, आणि आर्वाचीन
काळचा लॉर्ड बेकन, यांचीं हि मतें अशींच होतीं शे-

वर्टी सांगितलेला बेकन हा असें ह्मणतो, कीं "हें जग ईश्वरावांचून निर्माण झालें व चाललें आहे असें मानण्यापेक्षां, सर्व प्रकारच्या भाकड कथा खऱ्या मानणें हें पुरवेल." याजकरितां वर सांगितलेल्या तरुण गृहस्थांच्या नास्तिक मतापेक्षां, स्वदेशीय मूढजनांची मूर्तिपूजा राममोहन राय यास कांहीं अंशीं बरी वाटली यांत कांहीं आश्चर्य नाहीं. या नास्तिक मताचें प्राबल्य इतकें वाढलें, कीं कित्येक सुज्ञ हिंदु गृहस्थांस त्यास प्रतिबंध करण्यास कोणत्या तरी उपायाची योजना करणें अवश्य असें वाटून, त्यांणीं लोकांचें पारमार्थिक हित करण्याच्या उद्देशानें एक सभा स्थापिली. त्यांची अशी पक्की खात्री झाली कीं भरतखंडाच्या पुनर्जन्माचें महत्कार्य, त्याच्या धर्मसंबंधी आणि नीतिसंबंधी सुधारणेकडेस योग्य लक्ष दिल्याविना, सिद्धीस जावयाचें नाहीं.

राममोहन रायास, एकीकडेस मूर्तिपूजा, आणि दुसरीकडेस नास्तिक मत, या दोहोंशीं युध्द करावें लागलें. एकीचा समूळ उच्छेद करणें, आणि दुसऱ्याच्या भयंकर गतीस अटकाव करणें, या कार्याकडेस त्याचें सर्व लक्ष असे. या कार्यास योग्य अशा गुणेंकरून तो संपन्न होता, हें सांगावयास पाहिजे असें नाहीं. त्याची बुध्दि आणि धैर्य हीं अशीं होतीं, कीं तो काळ होता त्यापेक्षां अंमळ अधिक अनुकुळ असतात, तर त्याणें भरतखंडांत धर्मसु-

धारणा करून नीतीची वृधि केली असतां यांत कांहीं संशय नाहीं. राममोहन राय दुसऱ्यांस आपणामागून नेणारा होता, आपण दुसऱ्यांमागून जाणारा नव्हता.

राममोहन राय हा खरोखर मोठ्या योग्यतेचा पुरुष होय. त्याची बुधि तीव्र व सर्व विषयांत चालणारी अशी असून, त्याणें तिचा सर्वोत्कृष्ट उपयोग केला. विद्वत्ता, खोल विचार, आणि चांगल्या विषयांची अभिरुचि, यांत त्याच्या तुलनेचा असा कोणच हिंदु त्या वेळीं नव्हता. त्याची बुधि आणि नीति यांवरून, त्याची गणना मनुष्यजातींतील निवड पुरुषांमध्यें होते. त्याची बुधि विशाळ आणि अंतःकरण उदार असे. स्वजातीय प्राण्यांचें बरें करणें हा मृत्युलोकीं मनुष्याचा एक मुख्य धर्म होय, हें जितकें त्याच्या मनांत बिंबलें होतें त्याहून अधिक दुसऱ्या कोणाच्या असेल असें वाटत नाहीं. इतरांनीं आपणाशीं ज्या रीतीनें वागावें असें आपण इच्छितों, त्याच रीतीनें आपण त्यांशीं वागावें, हें खिस्ती शास्त्रांतील उत्कृष्ट वचन ते वारंवार घोकीत असे. इतर मनुष्यांचें दुःख कमी करणें आणि सुख वाढविणें यांत त्यास अत्यानंद वाटत असे. हिंवाळ्यांत एके दिवशीं सकाळीं तो फिरायास गेला होता तो परत येत असतां, एक भाजीविकणारा त्याच्या दृष्टीस पडला; त्याणें थकल्यामुळें विश्रांति घेण्यासाठीं डोकीवरलें ओझें खालीं उतरलें होतें; परंतु तें पुनः वर घेण्यास